- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
✔ २४ कॅरेट : १,४६,७०० /-
✔ २२ कॅरेट : १,२९,३५० /-
✔ चांदी : १,८८,३००/-

दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर
संचालक-संपादक : अजय बिवडे

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : रविवार, १ नोव्हेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३२२ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# नाशिकमध्ये सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पर्वाला सुरुवात!

## राष्ट्रपती, मुख्यमंत्र्यांच्या हस्ते धर्मध्वजारोहण सोहळा

**वृत्तसंस्था, नाशिक**

कुंभनगरी नाशिकमध्ये आजपासून (शनिवार, ३१ ऑक्टोबर) ऐतिहासिक सिंहस्थ कुंभमेळा पर्वाला सुरुवात झाली आहे. नाशिक आणि त्र्यंबकेश्वरमधील सिंहस्थ कुंभमेळा पुढील वर्षापर्यंत सुरू राहणार असून वासाठी नाशिक-त्र्यंबकेश्वरचा मोठा विकास करण्यात आलेला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते नाशिकमधील रामकुंडावर आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते त्र्यंबकेश्वरमधील कुशावर्तावर ऐतिहासिक ध्वजारोहण करण्यात आले.

ज्या दिवसाची प्रतीक्षा नाशिककरांसह अवघ्या महाराष्ट्र आणि देशवासीय करत होते तो दिवस अखेर उगवला आहे. दुपारी बरोब्बर १२ वाजून २ मिनिटांनी ऐतिहासिक कुंभमेळा पर्वाला सुरूवात झाली. ऐतिहासिक आणि पौराणिक महत्त्व असलेल्या नाशिक आणि त्र्यंबकेश्वर म्हणजेच त्र्यंबक नगरीत आता अधिकृत सिंहस्थ कुंभमेळा पर्वाला सुरुवात झाली आहे. यावेळी राज्यपाल जिष्णू देव वर्मा, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच सुनेत्रा पवार, श्रृंगेरी पिठाचे शंकराचार्य शिवाय १३आखाड्यांच्या महंतांची प्रमुख उपस्थिती होती.

कुंभपर्वाचा आरंभ करण्यासाठी ध्वजारोहण सोहळ्यासाठी वर्षभरापासून नाशिकमध्ये विकासकामांचा धडाका सुरू होता. तर दोन दिवसांपासून



नाशिकसह आणि त्र्यंबकेश्वर ध्वजारोहण सोहळ्यासाठी सजवायला सुरूवात झाली होती. गोदावरी काठ परिसर, मंदिरे फुलांनी तसेच आकर्षक विद्युत रोषणाईमुळे सर्वांचे लक्ष वेधून घेत आहेत. अवघी नाशिक नगरी झेंडे आणि पताकांनी भगवेमय करण्यात आली आहे. यावेळी ध्वजारोहण सोहळ्यासाठी रामकुंडवर ५१ फूट उंचीचा मुख्य धर्मध्वजस्तंभ उभारण्यात आला आहे. यासाठी पंचधातूंचा वापर करण्यात आला आहे. त्र्यंबकेश्वरमधील कुशावर्त तीर्थावर तब्बल ३१ फूट उंचीचा मुख्य ध्वजस्तंभ उभारला आहे. या स्तंभाला ६२ किलो पितळाचा मुलामा आहे.

दोन्ही ध्वजारोहण सोहळे एकाचवेळी करण्यात आले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू नाशिकमधून (रामकुंड) आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस त्र्यंबकेश्वरमधून (कुशावर्त) उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर शंकराचार्यांनी कुशावर्त कुंडात स्थान केले. प्रति कुशावर्त अशी ओळख असलेल्या श्रीचंद्र घाटावरही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कुशावर्तावर ध्वजारोहण केल्यानंतर मुख्यमंत्री श्रीचंद्र घाटावर गेले होते.

थोडक्यात

## बूट कारखान्यात भीषण आग; ४ ठार, दोघे गंभीर

**नवी दिल्ली :** शुक्रवारी रात्री उशीरा दिल्लीच्या बाहेरील भागातील मंगोलपुरी औद्योगिक क्षेत्रात (फेज १) एका बूट कारखान्यात भीषण आग लागली. या दुर्घटनेत चार जणांचा मृत्यू झाला असून, इतर दोघे रुग्णालयात मृत्यूशी झुंज देत आहेत. ही घटना रात्री साडेनऊच्या सुमारास कारखान्यात घडली. आगीची माहिती मिळताच पोलीस आणि अग्निशमन दलाच्या पथकांनी घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन दलाच्या जवानांनी अनेक तास शर्थीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली आणि कारखान्यात अडकलेल्या लोकांना बाहेर काढले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बचाव कार्यादरम्यान कारखान्यातून सहा जणांना बेशुद्ध अवस्थेत बाहेर काढण्यात आले. त्यांना तातडीने मंगोलपुरीतील संजय गांधी मेमोरियल रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे डॉक्टरांनी चौघांना मृत घोषित केले, तर उर्वरित दोघांवर उपचार सुरू आहेत. प्राथमिक माहितीनुसार, आग कारखान्याच्या तळघरात (बेसमेंट) लागली होती, त्यानंतर धूर आणि ज्वाळा वरच्या मजल्यांपर्यंत पसरल्या. कारखान्यात पसरलेल्या दाट धुरामुळे बचाव कार्यात अडथळे आले.

## केंद्र सरकारकडून जनगणनेच्या तारखा जाहीर

**नवी दिल्ली :** जनगणना २०२७ संदर्भात केंद्र सरकारने महत्त्वाची अपडेट दिली आहे. केंद्र सरकारकडून २०२७ च्या जनगणनेच्या तारखा देशभरात जाहीर करण्यात आल्या आहेत. सरकारने २५ जानेवारी २०२७ ते २८ फेब्रुवारी २०२७ या तारखा निश्चित करून जनगणनेची घोषणा केली आहे. जनगणनेसाठी संदर्भ तारीख १ मार्च २०२७ रोजी मध्यरात्री १२ वाजता निश्चित करण्यात आली आहे. सरकारच्या म्हणण्यानुसार, बर्फवृष्टी होणारा भाग आणि निवडणुका असलेल्या राज्यांव्यतिरिक्त देशाच्या उर्वरित भागात २५ जानेवारी ते २८ फेब्रुवारी २०२७ दरम्यान जनगणना केली जाणार आहे. अधिकृत अधिसूचनेनुसार, जनगणनेसाठी संदर्भ तारीख १ मार्च २०२७ रोजी मध्यरात्री १२ असेल. या टप्प्यामध्ये बर्फवृष्टी होणा-या आणि निवडणुका असलेल्या राज्यांमध्ये जनगणना घेतली जाणार नाही. निवडणुकांमुळे मणिपूर, गोवा, उत्तर प्रदेश, पंजाब आणि उत्तराखंडमध्ये सध्या जनगणना होणार नाही. तर, लडाख, हिमाचल प्रदेश आणि जम्मू आणि काश्मीरमधील बर्फवृष्टी होणाऱ्या भागांमध्ये देखील जनगणना होणार नाही. या भागांसाठीच्या जनगणनेच्या तारखा स्वतंत्रपणे जाहीर केल्या जातील.

भारताचे जनगणना आयुक्त मृत्युंजय कुमार नारायण यांनी जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, मणिपूर, गोवा, उत्तर प्रदेश, पंजाब, उत्तराखंड, लडाख, हिमाचल प्रदेश आणि जम्मू आणि काश्मीरमधील बर्फवृष्टी होणारे भाग वगळता सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये २५ जानेवारी २०२७ ते २८ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत जनगणना होणार आहे. जनगणनेसाठी सरकार ऑनलाइन पोर्टल सुरू करणार आहे. मुख्य जनगणनेच्या कामापूर्वी सरकार नागरिकांना तपशील स्वयं-नोंदणी करण्याची परवानगी देईल.

## घरात १० दिवसांचा अन्नसाठा शिल्लक ठेवा, १७ देशांचा नागरिकांना इशारा!

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

जगभरात सध्या वेगळ्याच घडामोडी पाहायला मिळत आहेत. युरोपपासून आशियापर्यंत तब्बल १७ देशांनी आपल्या नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीसाठी तयार राहण्याचा सल्ला दिला आहे. घरात किमान तीन दिवस पुरेल इतका अन्नधान्य आणि जीवनावश्यक वस्तूंचा साठा ठेवण्याचे आवाहन अनेक सरकारांनी केले आहे. काही देशांनी तर सात ते दहा दिवसांचा साठा ठेवण्याचा सल्ला दिला आहे. त्यामुळे जग एखाद्या मोठ्या संकटाच्या तयारीत आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

ब्रिटनने नागरिकांना किमान तीन दिवस पुरेल इतका अन्न आणि पाण्याचा साठा ठेवण्यास



सांगितले आहे. जपाननेही तीन दिवसांचा साठा ठेवण्याचा सल्ला दिला असून, शक्य असल्यास तो एका आठवड्यापर्यंत वाढवण्याचे आवाहन केले आहे.

बेल्जियम, फ्रान्स, नेदरलँड्स आणि फिनलंड या देशांनी किमान ७२ तासांची तयारी ठेवण्यास सांगितले आहे. तर स्वीडन आणि नॉर्वेने नागरिकांना सात दिवस स्वतःच्या गरजा भागवता येतील, अशी व्यवस्था करण्याचा सल्ला दिला आहे.

जर्मनीने तीन ते दहा दिवसांचा साठा ठेवा असल्याचे म्हटले आहे. तैवानमध्येही नागरिकांना एका आठवड्याच्या गरजेपुरत्या वस्तू घरात ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मात्र, या सूचनांचा अर्थ जगात युद्ध सुरू होणार आहे किंवा एखादी मोठी आपत्ती येणार आहे, असा होत नाही. सरकारांनी कोणत्याही युद्धाची अधिकृत घोषणा केलेली नाही. पण भविष्यात अचानक संकट निर्माण झाल्यास मदत पोहोचण्यास वेळ लागू शकतो, याची जाणीव सरकारांना झाली आहे.

वीजपुरवठा अनेक दिवस खंडित झाला तर एटीएम बंद पडू शकतात. ऑनलाइन पेमेंट सेवा ठप्प होऊ शकतात. मोबाईल नेटवर्क बंद पडू शकते. पाणीपुरवठा विस्कळीत होऊ शकतो. वाहतूक आणि पुरवठा व्यवस्था कोलमडल्यास सुपरमार्केटमधील वस्तूही मिळणे अवघड होऊ शकते. अशा वेळी नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागू शकतो. युक्रेनमधील युद्ध, कोरोना आणि जगभरात वाढणाऱ्या नैसर्गिक आपत्तींचा अनुभव लक्षात घेऊन अनेक देशांनी ही खबरदारी घेतली आहे. पूर, वणवे, वादळे, उष्णतेच्या लाटा, सायबर हल्ले आणि आंतरराष्ट्रीय तणाव यामुळेही मोठे संकट निर्माण होऊ शकते.

**नागरिकांनी घरात काय साठवून ठेवावे ?**

पिण्याचे पाणी, खाद्यपदार्थ, आवश्यक औषधे, टॉर्च, अतिरिक्त बॅटरी, पॉवर बँक, रेडिओ आणि काही रोख रक्कम घरात ठेवण्याचा सल्ला देण्यात आला आहे. या वस्तू एकाच वेळी खरेदी करण्याऐवजी हळूहळू साठवून ठेवाव्यात. घाबरून जाऊन मोठ्या प्रमाणात खरेदी करण्याची गरज नाही. हा इशारा घाबरवण्यासाठी नसून नागरिकांना सतर्क करण्यासाठी आहे. संकट कधी आणि कोणत्या स्वरूपात येईल, हे सांगता येत नाही. मात्र, अशा वेळी किमान काही दिवस स्वतःच्या गरजा भागवता येतील, एवढी तयारी असणे गरजेचे आहे.

# 'भारतपर्व २०२६' मध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची महाराष्ट्र पर्यटनाच्या दालनाला भेट

### पैठणीच्या समृद्ध विणकाम परंपरेची घेतली माहिती; महाराष्ट्राच्या कला, संस्कृती आणि पर्यटनवैभवाचे सादरीकरण

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

महाराष्ट्र पर्यटन विभागाच्यावतीने गुजरातमधील केवडिया (एकतानगर) येथे राष्ट्रीय एकता दिन आणि भारत पर्व २०२६ च्या निमित्ताने आयोजित उपक्रमात पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राचे विशेष पर्यटन दालन उभारण्यात आले आहे. या दालनाला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भेट दिली.

या भेटीदरम्यान प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्राच्या पारंपरिक हातमागावरील देखण्या पैठणी साड्यांची पाहणी केली. पैठणी विणकामामागील कलाकुसर, पारंपरिक तंत्र, त्यातील बारकावे आणि महाराष्ट्राच्या समृद्ध वस्त्रपरंपरेची त्यांनी माहिती जाणून घेतली. या माध्यमातून महाराष्ट्राच्या पारंपरिक कला, हस्तकला, सांस्कृतिक वारसा आणि कारागिरांच्या कौशल्याचे दर्शन त्यांना घडले. पर्यटन संचालनालयाचे उपसंचालक विजय जाधव आणि त्यांच्या टीमने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे स्वागत केले.

राष्ट्रीय एकता दिन आणि भारत



पर्व २०२६ च्या निमित्ताने गुजरातमधील केवडिया (एकतानगर) येथे १ ते १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत आयोजित या उपक्रमात महाराष्ट्र पर्यटन विभाग सहभागी होत आहे. पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली विभागाच्या वतीने उभारण्यात आलेल्या या विशेष दालनाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील वैविध्यपूर्ण पर्यटनस्थळे, समृद्ध सांस्कृतिक वारसा, पारंपरिक कला, खाद्यसंस्कृती आणि हस्तकलेचे दर्शन देशभरातील पर्यटकांना घडविण्यात येत आहे. या उपक्रमासाठी महाराष्ट्र पर्यटन विभागाचे प्रतिनिधी म्हणून छत्रपती संभाजीनगरचे विभागीय उपसंचालक विजय जाधव उपस्थित आहेत. दालनात महाराष्ट्रातील प्रमुख पर्यटनस्थळांची माहिती देणारी माहितीपत्रके आणि पर्यटनविषयक साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. तसेच पैठणी विणकामाचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक, महाराष्ट्रीय खाद्यपदार्थांचे स्टॉल, पारंपरिक खाद्यसंस्कृती आणि हस्तकलेच्या विविध वस्तू ही दालनाची प्रमुख आकर्षणे आहेत. इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट (आयएचएम), दादर येथील किचन स्टुडिओच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या वैशिष्ट्यपूर्ण खाद्यसंस्कृतीचेही सादरीकरण करण्यात येत आहे. याशिवाय, महाराष्ट्राच्या समृद्ध लोककला आणि सांस्कृतिक परंपरांचे दर्शन घडविण्यासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील गड-किल्ले, समुद्रकिनारे, धार्मिक स्थळे, निसर्गरम्य पर्यटनस्थळे, साहसी पर्यटन, ग्रामीण पर्यटन आणि सांस्कृतिक परंपरा यांची माहिती या दालनाच्या माध्यमातून पर्यटकांना देण्यात येत आहे. पैठणीसारखी पारंपरिक वस्त्रकला, स्थानिक खाद्यपदार्थ, हस्तकला आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून पर्यटकांना सांस्कृतिक वैभवाची ओळख करून देण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. या उपक्रमामुळे महाराष्ट्रातील पर्यटनस्थळांना राष्ट्रीय स्तरावर प्रसिद्धी मिळण्यासोबतच राज्यातील पर्यटन व्यवसाय, स्थानिक कलाकार, कारागीर आणि खाद्यसंस्कृतीला प्रोत्साहन मिळणार आहे.

पर्यटन विभागाचे सचिव संजय यादव म्हणाले, राष्ट्रीय एकता दिनाच्या निमित्ताने देशातील विविध राज्यांच्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांची ओळख करून देणे, परस्पर संवाद वाढविणे आणि विविधतेतील एकतेची भावना अधिक दृढ करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक ओळखीचा, ऐतिहासिक वारशाचा, वैशिष्ट्यपूर्ण खाद्यपरंपरेचा आणि पर्यटन क्षेत्रातील विविध संधींचा देशभरातील पर्यटकांसमोर प्रभावीपणे परिचय करून देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्र पर्यटनाच्या दालनाला भेट देऊन राज्याच्या समृद्ध कला, संस्कृती आणि पारंपरिक पैठणी विणकामाची माहिती जाणून घेतली, याबद्दल आम्ही त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. त्यांची ही भेट महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाला आणि पर्यटनवैविध्याला राष्ट्रीय स्तरावर अधिक व्यापक प्रसिद्धी मिळवून देणारी ठरेल.

पर्यटन संचालनालयाचे संचालक विकास पानसरे म्हणाले की, महाराष्ट्राला जागतिक पर्यटन नकाशावर एक महत्त्वपूर्ण पर्यटनस्थळ म्हणून ओळख मिळवून देण्यासाठी राज्यातील पर्यटनवैविध्याची देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रभावी मांडणी करणे आवश्यक आहे. पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र पर्यटन विभाग विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर राज्याचे पर्यटनवैभव प्रभावीपणे सादर करण्यासाठी प्रयत्नशील आहे. गुजरातमधील केवडिया (एकतानगर) येथे आयोजित या उपक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्राचा ऐतिहासिक वारसा, निसर्गसौंदर्य, पारंपरिक कला, खाद्यसंस्कृती आणि सांस्कृतिक परंपरा व्यापक स्तरावर पोहोचविण्याची संधी मिळत आहे.

महाराष्ट्र पर्यटनाच्या दालनाला भेट दिल्याबद्दल आणि राज्याच्या सांस्कृतिक वारशाची दखल घेतल्याबद्दल आम्ही प्रधानमंत्री यांचे मनःपूर्वक आभार मानतो. त्यांच्या या भेटीमुळे महाराष्ट्राच्या पर्यटनवैभवाला राष्ट्रीय स्तरावर अधिक व्यापक प्रसिद्धी मिळण्यासोबतच राज्यातील पर्यटनस्थळांकडे देशभरातील पर्यटकांचे लक्ष वेधले जाण्यास आणि पर्यटन क्षेत्राच्या विकासाला चालना मिळण्यास मदत होईल.

## नोव्हेंबरच्या पहिल्याच आठवड्यात जमा होणार

### अग्रिम रक्कम लाभार्थी शेतकऱ्यांची यादी आली

**वृत्तसंस्था, मुंबई**

राज्यातील १.५ कोटी शेतकऱ्यांसाठी आनंदवार्ता धडकली आहे. ५ हजारांची अग्रिम रक्कम त्यांच्या खात्यात जमा होणार आहे. लाभार्थ्यांची यादी सुद्धा धडकली आहे. नुकताच दोन हजारांचा पीएम किसानचा हप्ता जमा झाला. आणि आता अग्रिम रक्कम जमा होणार आहे. नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात म्हणजे २ नोव्हेंबरपासून शेतकऱ्यांच्या बँक खात्यात अग्रिम रक्कम वाटप करण्यास सुरूवात होणार आहे.

राज्यातील ३०४ तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. त्यातील १.५ कोटी शेतकऱ्यांना ५ हजारांची अग्रिम रक्कम त्यांच्या खात्यात जमा होणार आहे. लाभार्थ्यांची यादी सुद्धा तहसील कार्यालयात दाखल झाली आहे. काल ३० ऑक्टोबर रोजी २,००० रुपयांचा पीएम किसानचा हप्ता जमा झाला. आता अग्रिम रक्कम जमा होणार आहे.

पावसाने ओढ दिल्याने राज्यात भीषण दुष्काळी परिस्थिती आहे. पिकांचे नुकसान झालेले आहे. राज्य सरकारने १.५० कोटी शेतकऱ्यांना प्रत्येकी पाच हजार रुपये अग्रिम मदत देण्याचे जाहीर केले आहे. हा निर्णय घेतल्यानंतर आता पात्र शेतकऱ्यांची यादी तहसील कार्यालयात दाखल झाली आहे. या यादीची पडताळणीही सुरू झाली आहे.

राज्यातील ३०४ तालुक्यांत फडणवीस सरकारने दुष्काळ जाहीर केला आहे. दिवाळीपूर्वी या शेतक-यांच्या खात्यात दुष्काळी अग्रिम मदत निधी जमा करण्यात येणार आहे. ५ हजार रुपये पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात थेट लाभ हस्तांतरणाद्वारे जमा करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. राज्यातील १ कोटी ५० लाख शेतकऱ्यांच्या खात्यात ही रक्कम जमा करण्यात येणार आहे. आधारशी जोडणी केलेल्या बँक खात्यात मदत निधी जमा होईल.

ज्या शेतकऱ्यांना खरीप हंगामात ३३ टक्क्यांपेक्षा अधिकचे नुकसान झाले आहे. त्यांना ५००० रुपयांची अग्रिम मदत जाहीर केली आहे. त्यासाठी राज्य सरकारने ७,५०० कोटींच्या निधीला मंजुरी दिली आहे. ही अंतिम नुकसान भरपाई रक्कम नाही.

संपादकीय लेखणीतून...

## आरोप-प्रत्यारोप

विधान परिषदेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीने महायुतीला धोबीपछाड मारल्यानंतर आता सत्ताधारी महायुतीमध्येच आरोप-प्रत्यारोपांचे रण माजले आहे. शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघांच्या निवडणुकीत पुणे आणि नागपूरमध्ये मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेने महायुतीचा धर्म पाळला नाही, असा आरोप प्रदेश भाजपचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी गुरुवारी केला. त्यानंतर भाजप नेत्यांनीही शिवसेनेवर टीकेचे आसूड ओढले. शिवसेना शिंदे गटानेही भाजपवर पलटवार करत भाजपला विधान परिषद निवडणुकीतील पराभवाचे आत्मपरीक्षण करण्याचा सल्ला दिला. या आरोप-प्रत्यारोपांमुळे महायुतीत बेबनाव व राजकीय संघर्ष पेटण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. विधान परिषदेच्या पार पडलेल्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत महायुतीतील प्रमुख पक्ष असलेल्या भाजपला पराभवाचा सामना करावा लागला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिष्ठेच्या केलेल्या नागपूर आणि पुणे पदवीधर मतदारसंघात भाजपला मानहानीकारक पराभवाला सामोरे जावे लागले. पुणे शिक्षक मतदारसंघात भाजपच्या अधिकृत उमेदवाराला शिवसेना शिंदे गटाने पाठिंबा दिलेल्या अपक्ष उमेदवाराशी विजयासाठी झुंजावे लागले. त्यामुळे भाजपने विधान परिषद निवडणुकीतील पराभवाचे खापर शिंदे गटावर फोडले. शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत पुणे आणि नागपूरमध्ये मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेने अपेक्षित सहकार्य केले नाही. पुण्यात ऐनवेळी सचिन सानप यांना पाठिंबा देऊन शिवसेनेने महायुतीच्या एकजुटीलाच धक्का दिला.त्यांना मिळालेली मते पदवीधर निवडणुकीत भाजपला मिळाली नाहीत. तर छत्रपती संभाजीनगरमध्ये अब्दुल सत्तार यांनी थेट राष्ट्रवादी काँग्रेसच्या विरोधात प्रचार केल्याने त्याचाही फटका बसल्याची टीका प्रदेश भाजपचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी गुरुवारी केली. शिवसेनेने महायुतीचा धर्म पाळून भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसला सहकार्य केले असते, तर पाचही जागांवर महायुतीचा विजय झाला असता. मात्र, पुण्यातील एका जागेच्या हव्यासापोटी शिवसेनेने मित्रपक्षांना अडचणीत आणले आणि तीन जागांवरील विजयाची संधी गमावली. एका जागेसाठी मित्रपक्षांचे नुकसान करण्याची भूमिका महायुतीच्या हिताची नाही, असे नवनाथ बन यांनी शिंदे गटाला सुनावले. शिंदे गटाचे प्रवक्ते आनंद परांजपे यांनी भाजपचे आरोप फेटाळून लावले आहेत.

पुणे पदवीधरमध्ये भाजपने दिलेला उमेदवार हा भाजपचा सदस्यही नव्हता. बाहेरचा उमेदवार दिल्यामुळे भाजपच्या निष्ठावान कार्यकर्त्यांमध्ये नाराजी निर्माण होऊन त्यांनी आणि मतदारांनी या उमेदवाराला नाकारले. त्यामुळे या पराभवाचे खापर शिवसेनेवर फोडणे चुकीचे आहे, असे परांजपे म्हणाले. विधान परिषद निवडणुकीतील पराभवाबद्दल भाजपकडून शिवसेनेवर करण्यात येणारे आरोप बिनबुडाचे असून तिन्ही पक्षांनी या निकालाचे आत्मपरीक्षण करावे, असा सल्लाही आनंद परांजपे यांनी दिला. निवडणूक निकाल बघता महायुतीच्या तिन्ही पक्षांनी सावध होण्याची गरज आहे, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) नेते हसन मुश्रीफ यांनी दिली.

निवडणुकीवर जेन झीचा प्रभाव मान्य करताना आपापसात भांडत बसलो, तर त्याचे काय परिणाम होतात हे निकालातून दिसून आले, असे मुश्रीफ म्हणाले. पुण्यात शिवसेनेच्या रवींद्र धंगेकर यांनी थेट भाजपच्या विरोधात भूमिका घेतली, तर छत्रपती संभाजीनगरमध्ये शिवसेनेच्या अब्दुल सत्तार यांनी छुपा प्रचार केल्याने अजित पवार गटाचे सतीश चव्हाण पराभूत झाले. शिवसेना नेहमीच युतीधर्म पाळते आणि युतीधर्माचे पालन झाले पाहिजे, ही शिवसेनेची भूमिका कायम आहे. या निवडणुकीत शिवसेना व भाजपमध्ये चार ठिकाणी युती होती. एका ठिकाणी पुणे मतदारसंघामध्ये शिवसेना पुरस्कृत आणि भाजपचा उमेदवार अशी मैत्रीपूर्ण लढत होती. त्यामुळे शिवसेनेने नेहमी युतीधर्म पाळलेला आहे आणि युतीधर्म पाळावा, अशी शिवसेनेची भूमिका नेहमी राहिलेली आहे, असे शिवसेना शिंदे गटाचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. शिवसेना नेते उदय सामंत म्हणाले, एकनाथ शिंदेंना सल्ला देऊ नये, मी फडणवीसांना सल्ला दिल्यास कसे वाटेल? धंगेकरांनी जे पत्र काढले, त्याची दखल शिंदे घेतील.



# सौदी अरेबियाचे हुतींसमोर आत्मसमर्पण की शांततेसाठी मुत्सद्देगिरी?

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

हुती बंडखोर सौदीच्या पायाभूत विकासावर व तेल वाहिन्यांवर सतत हल्ले करत असल्यामुळे हे हल्ले थांबविण्यासाठी सौदी अरेबियाने हुंती बंडखोरांना एक अब्ज डॉलरची पॅकेज देऊन आत्मसर्पण केल्याची बातमी माध्यमांवर येत आहे. खरंच सौदी अरेबियाने हुती बंडकरांसमोर आत्मसमर्पण केले? सौदी अरबने हूती विद्रोह्यांसमोर आत्मसमर्पण केलेले नाही. मीडिया रिपोर्ट्सनुसार, नुकतेच सौदी अरबने युद्धाचा मार्ग सोडून मुत्सद्देगिरी आणि आर्थिक पॅकेजद्वारे शांतता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत, परंतु त्यांनी हूतींसमोर गुडघे टेकलेले नाहीत.

सौदी अरेबिया आणि येमेनचे इराण-समर्थित हुती बंडखोर यांच्यातील लष्करी संघर्ष ऑक्टोबर २०२६ मध्ये अत्यंत तीव्र झाला आहे. २०२२ मधील संयुक्त राष्ट्रांच्या मध्यस्थीने झालेली तात्पुरती शांतता आणि युद्धबंदी आता पूर्णपणे संपुष्टात आली असून, संपूर्ण मध्य पूर्व या नव्या युद्धामुळे हादरले आहे. या संघर्षाचे मुख्य कारण, वर्षभरात अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू झालेल्या व्यापक प्रादेशिक युद्धामध्ये दडले आहे, ज्याचे पडसाद आता येमेन आणि सौदी सीमेवर उमटत आहेत.

सौदी अरेबिया आणि हुती बंडखोरांमधील संघर्ष हा प्रामुख्याने येमेन देशातील गृहयुद्धाचा भाग आहे, जो २०२६ मध्ये अमेरिका-इराण तणावामुळे पुन्हा एकदा अत्यंत तीव्र झाला आहे. २०१५ मध्ये सौदी अरेबियाने येमेनच्या आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त सरकारला पाठिंबा देत हुतींविरुद्ध लष्करी मोहीम सुरू केली होती. २०२२ मधील संयुक्त राष्ट्रांच्या मध्यस्थीने झालेल्या युद्धबंदीनंतर हा संघर्ष काही काळ शांत होता, परंतु अलीकडच्या काही महिन्यांत तो पुन्हा पेटला आहे.

येमेनच्या उत्तरेकडील 'झैदी' शिया पंथाच्या हुती बंडखोरांना सौदीचा कट्टर प्रतिस्पर्धी असलेल्या इराणचा पाठिंबा आहे. सौदी अरेबियाला आपल्या सीमेवर इराणचा प्रभाव वाढण्याची भीती आहे. हुतींनी येमेनची राजधानी सना आणि लाल समुद्राजवळील रणनीतिक दृष्ट्या महत्त्वाचे किनारे (उदा. बाब अल-मंदेब सामुद्रधुनी) काबीज केले आहेत. हा मार्ग जागतिक तेल वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. हुती बंडखोरांनी सौदी अरेबियाच्या शहरांवर, प्रामुख्याने विमानतळ आणि तेल वाहिन्यांवर क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले वाढवले आहेत.

प्रादेशिक तणाव कमी करण्यासाठी सौदी अरेबियाचे संरक्षण मंत्री प्रिन्स खालिद बिन सलमान, पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर आणि तुर्कियेचे गुप्तहेर प्रमुख यांनी संयुक्तपणे इराणची राजधानी तेहरानमध्ये जाऊन इराणी अधिकाऱ्यांशी चर्चा केली आहे. मात्र हुतिकडून सौदीवरील हल्ले थांबत नसल्याने सौदीने आत्मसमर्पण केल्याची चर्चा सध्या सोशल मीडियावर सुरू आहे. हुती बंडखोर सौदीच्या पायाभूत विकासांना व तेल वाहिन्यांवर सतत हल्ले करत असल्यामुळे हे हल्ले थांबविण्यासाठी सौदीने हुती बंडखोरांना १अब्ज डॉलरचे पॅकेज देऊन आत्मसमत पण केल्याच्या बातम्या समोर येत आहे.काही आंतरराष्ट्रीय माध्यमांच्या (उदा. इस्त्रायल हायोम) वृत्तानुसार, सौदी अरेबियाने हुतींकडून होणारे हल्ले रोखण्यासाठी आणि पुन्हा युद्धबंदी लागू करण्यासाठी इराणच्या मध्यस्थीने हुतींना १ अब्ज डॉलरचे आर्थिक पॅकेज देण्याचा प्रस्ताव ठेवल्याची चर्चा आहे, जेणेकरून येमेनमध्ये पायाभूत सुविधांची उभारणी करता येईल.

इस्त्रायली प्रसारमाध्यमांच्या वृत्तानुसार, सौदी अरबने हूती विद्रोह्यांना त्यांचे हल्ले थांबवण्यासाठी आणि युद्धविराम करण्यासाठी १ अब्ज डॉलर (सुमारे ९,५०० कोटी रुपये) देण्याची तयारी दर्शवली आहे. हा प्रस्ताव इराणच्या मध्यस्थीने सुरू असलेल्या शांतता चचेर्चा भाग असल्याचे सांगितले जात आहे.सौदी अधिकाऱ्यांच्या मते, हा कोणताही नवीन शरण येण्याचा प्रस्ताव नसून, सुमारे ३ वर्षांपूर्वी झालेल्या कराराच्या अटींची अंमलबजावणी करण्याचा भाग आहे.

या जुन्या करारानुसार, हूतींच्या ताब्यातील भागातील सरकारी कर्मचाऱ्यांचा पगार आणि पायाभूत सुविधांचा खर्च सौदीने उचलणे अपेक्षित होते, ज्याच्या बदल्यात हूतींनी हल्ले थांबवणे गरजेचे होते. हूतींचा आरोप आहे की सौदीने हा करार पाळला नाही, त्यामुळे त्यांनी पुन्हा हल्ले सुरू केले. सौदी प्रशासनाने स्पष्ट केले आहे की ते कोणत्याही प्रकारच्या "लष्करी ब्लॅकमेलिंग" समोर झुकणार नाहीत. युद्धविरामासाठी निधी तभी दिला जाईल जेव्हा हूतींनी यमनच्या आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त सरकारकडून बळकावलेले महत्त्वाचे प्रदेश परत करावेत, अशी अट सौदीने ठेवली आहे.

नुकतीच इराणची राजधानी तेहरान येथे सौदी अरब, इराण, तुर्की आणि पाकिस्तान यांच्या उच्च अधिकाऱ्यांमध्ये प्रादेशिक तणाव कमी करण्यासाठी एक महत्त्वाची सुरक्षा बैठक पार पडली आहे. त्यामुळे, जमिनीवर सुरू असलेल्या संघर्ष आणि तेल क्षेत्रांवरील हल्ल्यांमुळे सौदी अरब सध्या कूटनीतिक मार्गाने शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत आहे, मात्र याला "आत्मसमर्पण" म्हणता येणार नाही.

- ९५६१५९४३०६

# चौथ्या सामन्यात टिम इंडियाचे सितारे जमीनीवर!

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

न्यूझीलंडच्या भरगच्च दौऱ्याची सुरुवात सुरुवातीचे तीन सामने दणक्यात जिंकून टिम इंडियाने जोरदार सुरुवात केली. मात्र चौथ्या सामन्यात किवीजने पाहुण्या संघाला सणरुणीत चपराक देत मालिकेतील आघाडी १ -३ अशी कमी केली. चौथ्या टी२० सामन्यात न्यूझीलंडने भारताचा ८७ धावांनी पराभव केला. ऑकलंडमध्ये प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडने ७ गडी गमावून २५९ धावा केल्या. टी२० मध्ये भारताविरुद्ध कोणत्याही संघाने केलेली ही सर्वोच्च धावसंख्या आहे. यासोबतच, न्यूझीलंडविरुद्ध भारतालाही सर्वात मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले. शतकवीर ग्लेन फिलिप्सने नितीश रेड्डीच्या षटकात सलग चार षटकार मारले. टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये किर्वीविरुद्ध भारताचा हा सर्वात मोठा पराभव आहे. यापूर्वीचा विक्रम २०१९ मध्ये वेलिंग्टन येथे ८० धावांनी नोंदवला गेला होता. शुक्रवारी ऑकलंडमध्ये २६० धावांचे लक्ष्य गाठताना भारतीय संघ २० षटकांत ९ गडी गमावून केवळ १७२ धावाच करू शकला. एकाही फलंदाजाला अर्धशतक झळकावता आले नाही. तिलक वमार्ने सर्वाधिक ३५ धावा केल्या. जेकब डफीने ४ बळी घेतले. यापूर्वी, न्यूझीलंडने शुक्रवारी आपली सर्वोच्च टी२० आंतरराष्ट्रीय धावसंख्या नोंदवली. नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना, संघाने २० षटकांत ७ गडी गमावून २५९ धावा केल्या. ग्लेन फिलिप्सने ४९ चेंडूंमध्ये १०७ धावा केल्या आणि त्याला सामनावीर म्हणून गौरवण्यात आले. मायकल ब्रेसवेलने २५ चेंडूंमध्ये ६५ धावा केल्या.

**भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील चौथ्या टी२० सामन्यात घडलेले सर्वोच्च विक्रम आणि क्षण... न्यूझीलंडने ७ गडी गमावून २५९ धावा केल्या**

न्यूझीलंडने २५९/७ धावा केल्या. टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये भारताविरुद्ध कोणत्याही संघाने केलेली ही सर्वोच्च धावसंख्या आहे. यापूर्वी, इंग्लंडने याच वर्षी साउथहॅम्प्टनमध्ये ३ गडी गमावून २५७ धावा केल्या होत्या.

**भारताचा दुसरा सर्वात मोठा टी२० आंतरराष्ट्रीय पराभव**

ऑकलंडमध्ये भारत ८७ धावांनी पराभूत झाला. धावांच्या फरकाने झालेला हा भारताचा दुसरा सर्वात मोठा टी२० आंतरराष्ट्रीय पराभव आहे. यापूर्वीचा पराभव २०२२ मध्ये इंग्लंडमध्ये १२५ धावांनी झाला होता.

**न्यूझीलंडची सर्वोच्च टी-२० आंतरराष्ट्रीय धावसंख्या**

न्यूझीलंडनेही आपली सर्वोच्च टी२० आंतरराष्ट्रीय धावसंख्या नोंदवली. यापूर्वी, या संघाने २०२२ मध्ये स्कॉटलंडविरुद्ध ५ गडी गमावून २५४ धावा केल्या होत्या.

**अर्शदीप सिंग १५० टी-२० बळी घेणारा पहिला भारतीय ठरला**

अर्शदीप सिंगने टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये १५० बळी पूर्ण केले आणि असे करणारा तो पहिला भारतीय ठरला. हा टप्पा गाठण्यासाठी त्याने २,१४३ चेंडू घेतले. १५० बळी मिळवणारा हा तिसरा सर्वात वेगवान खेळाडू आहे. वानिंदू हसरंगा २,०३५ चेंडूंसह पहिल्या स्थानावर आहे. एका वर्षात सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज अर्शदीप सिंग आहे.

अर्शदीपने यावर्षी टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ४० बळी घेतले, ज्यामुळे तो पूर्ण सदस्य देशांमध्ये टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये एका वर्षात सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज ठरला आहे. यापूर्वी हा विक्रम आयर्लंडच्या जोश लिटलच्या नावावर होता, ज्याने २०२२ मध्ये ३९ बळी घेतले होते. न्यूझीलंडने यावर्षी भारताविरुद्ध २,०१२ धावा केल्या.

न्यूझीलंडने यावर्षी सर्व आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये भारताविरुद्ध २,०१२ धावा केल्या. एका वर्षात एकाच संघाविरुद्ध केलेल्या धावांची ही तिसरी सर्वाधिक संख्या आहे. या यादीत २,१०९ धावांसह कंबोडिया पहिल्या क्रमांकावर आहे आणि २,०७५ धावांसह भारत दुसऱ्या क्रमांकावर आहे. न्यूझीलंडने शेवटच्या १० षटकांत १५० धावा केल्या.

न्यूझीलंडने ११ ते २० षटकांच्या दरम्यान १५० धावा केल्या. भारताविरुद्ध शेवटच्या १० षटकांमध्ये कोणत्याही संघाने केलेली ही दुसरी सर्वोच्च धावसंख्या आहे. यापूर्वी, २०२२ मध्ये गुवाहाटी येथे दक्षिण आफ्रिकेने भारताविरुद्ध १५१ धावा केल्या होत्या.

**सँटनर: भारताविरुद्ध सर्वाधिक टी२० बळी घेणारा गोलंदाज**

मिचेल सँटनरने भारताविरुद्धच्या टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ३२ बळी घेतले आहेत, ज्यामुळे तो भारताविरुद्ध सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज ठरला आहे. न्यूझीलंडचा इश सोधी ३० बळींसह दुसऱ्या स्थानावर आहे.

**फिलिप्स हा सर्वाधिक 'प्लेअर ऑफ द मॅच' पुरस्कार जिंकणारा न्यूझीलंडचा खेळाडू आहे**

ग्लेन फिलिप्सने टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये १०व्यांदा 'प्लेअर ऑफ द मॅच' पुरस्कार जिंकला. त्याने १०१ सामन्यांमध्ये १०व्यांदा हा पराक्रम केला. मार्टिन गुप्टिलनेही १० पुरस्कार जिंकले आहेत, पण त्यासाठी त्याने १२२ सामने खेळले.

**फिलिप्सने भारताविरुद्धच्या मालिकेत सर्वाधिक धावा केल्या**

ग्लेन फिलिप्स भारताविरुद्धच्या टी-२० मालिकेत सर्वाधिक धावा करणारा खेळाडू ठरला. त्याने या टी-२० मालिकेत २७६ धावा केल्या. यापूर्वी हा विक्रम शाई होपच्या नावावर होता, ज्याने या वर्षाच्या सुरुवातीला भारताविरुद्धच्या चार सामन्यांमध्ये २६१ धावा केल्या होत्या.

**फिलिप्सने सूर्यकुमार यादवच्या विक्रमाची बरोबरी केली**

फिलिप्सने चौथ्या किंवा त्यापेक्षा खालच्या क्रमांकावर फलंदाजी करताना टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये सर्वाधिक शतके करण्याच्या बाबतीत सूर्यकुमार यादवच्या विक्रमाची बरोबरी केली. त्याने त्याचे तिसरे शतक झळकावले. ग्लेन मॅक्सवेल चार शतकांसह यादीत आघाडीवर आहे.

**नितीश रेड्डीने एका स्पेलमध्ये ६४ धावा दिल्या**

नितीश रेड्डीने ऑकलंडमध्ये न्यूझीलंडविरुद्ध ६४ धावा दिल्या. टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये भारतीय गोलंदाजाने दिलेला हा संयुक्तपणे दुसरा सर्वात महागडा स्पेल आहे. प्रसिद्ध कृष्णा ६८ धावांसह यादीत आघाडीवर आहे. युझवेंद्र चहल आणि वरुण चक्रवर्ती यांनीही ६४ धावा दिल्या आहेत.

**आणखी काही महत्वाचे क्षण... फिलिप्सने नितीशच्या सलग चार चेंडूंवर षटकार ठोकले**

नितीश रेड्डीने १६ व्या षटकात ३२ धावा दिल्या. फिलिप्सने या षटकातील सलग चार चेंडूंवर षटकार ठोकले. त्याने षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर एक्स्ट्रा कव्हरवरून षटकार लगावला. त्यानंतर, त्याने चौथ्या चेंडूवर ६३ मीटरचा षटकार मारला. त्यानंतर त्याने पुढच्या दोन चेंडूंवर सहा धावा ठोकल्या आणि संघाची धावसंख्या २०० च्या पुढे नेली. फिलिप्सने ४९ चेंडूंमध्ये १०७ धावा केल्या. त्याने सहा चौकार आणि १० षटकार मारले.

**जेकब्सने नितीश रेड्डीचा झेल सोडला**

भारतीय डावाच्या आठव्या षटकात नितीश रेड्डीचा झेल सोडण्यात आला. नितीशने नॅथन स्मिथच्या एका आखूड चेंडूवर पुल शॉट खेळण्याचा प्रयत्न केला, पण चेंडू त्याच्या बॅटच्या वरच्या भागाला लागून स्क्वेअर लेगच्या दिशेने हवेत उडाला. जेकब्स खोल क्षेत्ररक्षणातून पुढे येऊन चेंडू पकडण्यासाठी झेप घेतली, पण चेंडू त्याच्या हातातून निसटला. त्यावेळी नितीश दोन धावांवर फलंदाजी करत होता. जेकब्सने चेंडू पकडण्यासाठी पुढे झेप घेतली, पण तो त्याच्या हातातून निसटला.

- ९०९६३७२०८२

# सरकारला युवा पदवीधरांची नाराजी भोवली आणि काँग्रेसला चालून संधी आली!

संदीप देशपांडे
नागपूर

काल महाराष्ट्रातील विधान परिषदेचा निकाल आला सर्वांचे लक्ष असणारे नागपूर पदवीधर मतदारसंघात काँग्रेसने बाजी मारली. काँग्रेसचे उमेदवार अभिजीत वंजारी हे तब्बल ३२०० मतांनी निवडून आले. अटीतटीच्या या सामन्यात निकालाच्या शेवटपर्यंत रंगत होती. राजकीय पंडितांना मात्र हा विजय भाकीत नव्हता कारण भाजपा हा मतदारसंघ आपल्याकडे वळता करेल याची सर्वांनाच हमी होती तशी जोरदार लढत भाजपाने दिली देखील. भाजप उमेदवारांनी तिकीट मिळण्यासाठी देखील देवाला साकळे टाकले जसजसे तिकीट घोषित होण्यासाठी वेळ होत होता तसतसे भाजप उमेदवाराचे ठोके वाढत होते. तिकीट मिळवण्यात यश आले पण भाजपाच्या अंतर्गत कलहाने डोके वर केले. माजी आमदारांनी फॉर्म टाकला व शेवटच्या दिवशी देखील फॉर्म वापस नाही घेतला भाजप शिस्तप्रिय संघटना म्हणून ओळखली जाते. तरी देखील इतका भाजप उमेदवाराचा विरोध का? यामागील मुख्य कारण त्यांच्या स्वभावात असणारा अहंकार असावा.

२०१९ ला भाजपनी तिकीट नाकारल्यानंतर भाजप संघटनेत काही मोजके कोहळे समर्थक सोडले तर कोणाला विशेष दुःख झाले नव्हते. इतकेच काय जनसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी ज्या मंत्रालयात हे लोकप्रतिनिधी जातात त्या अधिकाऱ्यांना देखील कोहळे यांची तिकीट कटली म्हणून आनंद होता. ही त्यावेळची चर्चा नाही तर वास्तविकता होती. मास्तरांच्या राजकीय कारकीर्दीत भाजपाने भरभरून दिले. आमदार झाल्यानंतर दुसऱ्यांदा तिकीट नाकारण्याची दुःख त्यांच्या पचनी पडत नव्हत. त्यांनी राजकीय चातुर्य वापरून पुन्हा तिकीट मिळवण्यासाठी संघटनेत काम करणे सुरू केले. बावनकुळेंनी त्यांना ग्रामीण जिल्हाध्यक्ष बनवले इतकेच काय त्यांनी पश्चिम नागपूर मध्ये भाजपाची तिकीट देखील आणली येथे देखील फार कमी मताने पराभव सहन करावा लागला. पण मास्तर महत्त्वाकांक्षी होते पुन्हा त्यांनी स्वतःसाठी जागा शोधणे सुरू केले.

विधानसभेच्या निवडणुकीनंतर लागलीच त्यांनी विधान परिषदेच्या तिकिटासाठी स्वतःची जागा स्थापित करण्याचा प्रयत्न केला. यात पुन्हा बावनकुळे त्यांच्या पाठीशी उभे राहिले व तिकीट देखील मिळवून दिली. विधान परिषदेची उमेदवारी मिळाल्यानंतर बंडखोरांची नाराजी थांबवण्यासाठी स्वतः मुख्यमंत्र्यांना हस्तक्षेप करावा लागला. नाराजी जरी संपली तरी मनापासून कोणी जुळलेले दिसले नाही. मी मनापासून याकरता म्हणतो आहे की दुसऱ्या पसंतीचे मत भाजपाने मागीतलीच नाही. त्यांनाही हमी होती संघटनेतून आपण आपला परंपरागत गड पुन्हाः मिळवून टाकू.

इतकेच नाही बावनकुळे यांचा देखील दबक्या आवाजात विरोध होता.जातीच्या समीकरणात बावनकुळे पेक्षा जातीचा माणूस हा कृष्णा भाऊंना आपला समजतो इतकेच काय गोरगरीब जनतेसाठी आमदार कृष्णा खोपडेच पालकमंत्री आहेत. लोकांची आपुलकीने विचारपूस करून संबंधित मंत्रालयात कागदाचा पाठपुरावा करून देतात आता तर ठक्कळ मध्ये जनसामान्यांचा प्रश्नांचा न्यायनिवाडा खोपडे साहेब हक्काने करून देतात. मग तो कुठल्याही मतदारसंघाचा असो किंबहुना कोणत्याही पक्षाचा असो. युवा वर्गाला प्रवीण दटके आपलेसे वाटतात.

या दोन्ही नेत्यांचा वाढता जनाधार बघून भाजप नेत्या मध्ये देखील चिंता आहे. मग काय या दोन्ही नेत्यानी बावनकुळे ची शक्ती परीक्षा होऊ दिली असेल असे म्हणायला हरकत नाही.दुसरीकडे काँग्रेस उमेदवार मागच्या निवडणुकीपेक्षा आपली शक्ती फार कमी खर्च करताना दिसले. मात्र काँग्रेस संघटनेत मुख्य नेत्यांना अभिजीत कोणाचा हा प्रश्नच सुटत नव्हता. म्हणून खूप सारे दिग्गज नेते रणांगणात चेहरा दाखवण्या सारखे उतरले. मात्र गडचिरोली, चंद्रपुरात विजय वडेट्टीवार यांनी पूर्ण ताकद लावली. प्रचार सभेला काँग्रेस उमेदवार एकटे फिरताना सगळीकडे दिसत होते त्यांच्यासोबत कार्यकर्त्यांची टीम जरी नसली तरी ते सगळ्यांचा फॉलोअप भेटीगाठी नंतरही घेत होते. भाजपमध्ये पक्ष संघटना काम करताना दिसत होती. काँग्रेसमध्ये पदवीधर,शिक्षक मंच व सामाजिक संघटना कामाला लागल्या होत्या. त्यांना सोबतीला जातीचे समीकरण होतं त्यांनाही हमी होती की जातीचे मत वरचढ राहतील तसेच भाजप उमेदवाराला देखील त्यांच्या संघटनेवर विश्वास होता व सोबतीला जातीचे समीकरण देखील होते.

देवाची प्रार्थना दोन्ही उमेदवारांनी केली महत्त्वाकांक्षी मास्तरनी श्रद्धेने हात जोडले वारंवार प्रार्थना केली पण देवाने प्रसाद मात्र काँग्रेस उमेदवाराला दिला. हा निकाल म्हणजे देवाने दिलेल्या प्रसाद आहे या मागच्या कारणांचा विचार करूया. पदवीधरांचा उमेदवार म्हणून सभागृहात काही प्रश्न उचलल्यानंतर दरवर्षी रोजगार मेळावा भरवण्यावर आमदारांनी भर दिला होता. यामुळे पदवीधरांच्या मते दोन्ही उमेदवारांमध्ये भाजप संघटनात्मक वरचढ होती. या दोन्ही उमेदवारांना आव्हान दिले ते वर्धे चे नितेश कराळे मास्तर यांनी मोठ्या राजकीय पक्षाच्या या दोन्ही उमेदवारांना हे १००% माहित होते की कराळे मास्तर दहा हजार देखील मत घेणार नाही.

भाजपला मात्र कराळे मास्तरांनी दहा हजार मते घेतली तर त्याचा फायदा भाजप उमेदवारालाच होईल वाटत होते. भाजपचे निवडणूक गणित अतिशय सूक्ष्म नियोजनाचे असते पण या वेळेस मनाने काम करणारे नेते नसल्याने नियोजनात चुकले कराळे मास्तरांचे अधिक घेणारे मत हे दुसऱ्या क्रमांकाचे आपल्याला नुकसान देईल हे ते समजू शकले नाही व अहंकाराने एक लाखाचा पल्ला पहिल्या पसंतीच्या मताने गाठू अशा भ्रमात राहिले.

- ९३७१४४१९१९

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# पाणीटंचाई निवारणासाठी सर्व यंत्रणांनी प्राधान्याने कामे पूर्ण करावीत

## निधीची कमतरता भासू देणार नाही, जलसंधारण, विहिरींचे पुनर्भरण आणि चारा उपलब्धतेवर भर द्या : पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे निर्देश

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

जिल्ह्यातील संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी सर्व यंत्रणांनी आतापासूनच नियोजनबद्ध आणि प्राधान्याने कामे हाती घ्यावीत. पाणीपुरवठा योजनांसह जलसंधारणाची प्रलंबित कामे येत्या पावसाळ्यापर्यंत पूर्ण करावीत. कामांमधील त्रुटींची तातडीने तपासणी करून त्यांची पूर्तता करावी. जलस्रोतांमधील उपलब्ध पाणीसाठ्याचे योग्य नियोजन करून आवश्यक उपाययोजना तत्काळ राबवाव्यात, असे निर्देश राज्याचे महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

जिल्हा नियोजन भवन येथे आयोजित जिल्हास्तरीय पाणीटंचाई समितीच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल, खासदार मायाताई इवनाते, आमदार समीर मेघे, आशिष देशमुख, संजय मेश्राम, चरणसिंग ठाकूर, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी तसेच विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर केवळ पिण्याच्या पाण्याचेच नव्हे, तर पशुधनासाठी आवश्यक पाण्याचे आणि चाऱ्याचेही



नियोजन करणे गरजेचे आहे. पशुसंवर्धनासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला असून, फेब्रुवारी-मार्चपर्यंत जिल्ह्यात पुरेसा चारा उपलब्ध होईल, या दृष्टीने आतापासूनच कामाला सुरुवात करावी. जलसंवर्धन, लघुसिंचन, नाल्यांचे खोलीकरण, जलयुक्त शिवार, गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार आणि वनराई बंधाऱ्यांच्या कामांना प्राधान्य द्यावे, असेही पालकमंत्र्यांनी सांगितले.

जलसंपदा विभागाच्या कामांसाठी खनिज निधी उपलब्ध करून देण्यात येईल. आमदार आणि लोकप्रतिनिधींशी चर्चा करून विधानसभा मतदारसंघनिहाय कामांचे आराखडे तयार करावेत. या कामांसोबतच ग्रामीण भागातील नागरिकांना व्हीबीजी रामजी योजनेअंतर्गत रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात. प्रस्तावित कामांची सविस्तर नोंद करून ती आगामी मंत्रिमंडळ बैठकीत सादर करण्यात येईल. त्यानंतर आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच सीएसआर निधी आणि उद्योग समूहांच्या सहकार्यानेही जलसंधारणाची कामे पूर्ण करण्यात येतील, असे त्यांनी स्पष्ट केले.

जंगल परिसरातील पाण्याचे योग्य नियोजन करून वनराई बंधारे उभारावेत. यासाठी आवश्यक निधी आणि नियोजनाबाबत संबंधितांशी बैठक घ्यावी. जिल्ह्यातील जुन्या विहिरींचे पुनर्भरण करावे. कामठी येथे राबविण्यात आलेल्या उपक्रमाच्या धर्तीवर जिल्ह्यातील सर्व नगरपरिषदांच्या मुख्याधिकाऱ्यांनीही अशा प्रकारची कामे हाती घ्यावीत. गावांमधील पाणीटंचाई दूर करण्यासाठी छोट्या नळ पाणीपुरवठा योजना तयार कराव्यात, असे निर्देश त्यांनी दिले. जिल्ह्यातील विहिरींचे खोलीकरण तसेच बंद विहिरींचे पुनर्भरण करून पाणीसाठा वाढविता येईल. यासाठी विधानसभा मतदारसंघनिहाय जलसंधारण आराखडे तयार करावेत. उपविभागीय अधिकाऱ्यांशी समन्वय साधून या कामांचे नियोजन करावे, असेही पालकमंत्र्यांनी सांगितले.

थोडक्यात

## कारगावात 'प्रोजेक्ट ड्रीम'मधून ग्राम वाचनालयाची उभारणी

### विद्यार्थ्यांच्या हस्ते फीत कापून उद्घाटन, गावातच अभ्यास व स्पर्धा परीक्षांच्या तयारीची सुविधा



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना वाचन, अभ्यास आणि स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी गावातच सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषद नागपूरच्या 'प्रोजेक्ट ड्रीम' अंतर्गत कारगाव येथे ग्राम वाचनालय व अभ्यासिकेची उभारणी करण्यात आली आहे. या वाचनालयाचे उद्घाटन विद्यार्थ्यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. ग्रामीण विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी शहरांकडे धाव घ्यावी लागू नये, तसेच त्यांना गावातच अभ्यासाचे पोषक वातावरण, वाचनाची सवय आणि डिजिटल शिक्षणाच्या सुविधा मिळाव्यात, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. वासाठी गावातील वापरात नसलेल्या किंवा कमी वापरातील सार्वजनिक जागांचा शैक्षणिक उपयोग करून त्यांचे वाचनालय व अभ्यासिकांमध्ये रूपांतर केले जात आहे.

गावातील मुलाला अभ्यास, वाचन आणि मोठी स्वप्ने पाहण्यासाठी गाव सोडण्याची गरज पडू नये, ही या उपक्रमामागील संकल्पना आहे. कारगाव येथील वाचनालय विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धीसह त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना देणारे केंद्र ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. उद्घाटनप्रसंगी गटविकास अधिकारी डॉ. चेतन जाधव, सहाय्यक गटविकास अधिकारी ज्ञानेश्वर भोगे, प्रभारी सरपंच देविदास कुरुडकर, ग्रामपंचायत सचिव श्यामसिंग दहे, पोलीस पाटील निलेश भोगे, उच्च प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका नीलिमा पटणे, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## दिघोरी येथे ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

दक्षिण नागपूर परिसरातील दिघोरी येथे समाधान जेष्ठ नागरिक समितीच्या वतीने परिसरातील ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार समारंभ सोहळा नुकताच आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रामुख्याने नागपूर महानगरपालिकेचे नगरसेवक तथा माजी स्थायी समिती अध्यक्ष पिंटू झलके यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना अतिथिनी ज्येष्ठांच्या समाजात सहभाग का महत्त्वाचा आहे या विषयावर प्रकाश टाकला. यावेळी प्रामुख्याने देविदास बुढे, भाऊराव गोंदुले,सुरेश पैठणकर, रामराव राजनहिरे तसेच ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## सन्मित्र सभेची कोजागिरी पौर्णिमा उत्साहात साजरी

### विष्णू मनोहर यांच्याशी दिलखुलास संवादाने रंगली मैफल, गीत-संगीत आणि जादूच्या प्रयोगांनी रसिक मंत्रमुग्ध



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सन्मित्र सभेच्यावतीने शिवाजीनगर येथील स्थानिक शिवाजी सभागृहात आयोजित कोजागिरी पौर्णिमेचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. गीत-संगीत, जादूचे प्रयोग आणि सुविख्यात शेफ व कलाकार विष्णू मनोहर यांच्याशी झालेल्या दिलखुलास संवादामुळे कार्यक्रम रंगतदार ठरला. कार्यक्रमाची सुरुवात सन्मित्र प्रार्थना आणि डॉ. स्मिता होटे, अश्विनी देशपांडे, साधना कर्वे व अस्मिता शेंडे यांनी सादर केलेल्या श्रीसूक्ताने झाली. यावेळी अध्यक्ष अनिल शेंडे यांनी प्रास्ताविक केले. विवेक पळशीकर, माधुरी पाखमोडे, रत्नाकर केकतपुरे, मीरा जोगळेकर, साधना बनसोड, कॅप्टन राजेंद्र गोरले, राजन भूत, लेखराम पाखमोडे आणि प्रदीप दुग्गड यांनी मराठी व हिंदी गीतांचे सादरीकरण करून रसिकांची मने जिंकली. तर श्रीधर गरुड यांच्या जादूच्या प्रयोगांनी उपस्थितांना आश्चर्यचकित केले.

कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण विष्णू मनोहर यांच्याशी झालेला संवाद ठरला. त्यांनी आपल्या पाककलेतील कारकीर्द, विक्रम आणि अनुभवांचे किस्से सांगितले. तसेच 'नटसम्राट'मधील गणपतराव बेलवलकर यांच्या स्वगताच्या धर्तीवर सादर केलेले 'खाद्यसम्राट' हे विनोदी स्वगत विशेष गाजले. कार्यक्रमाला भाजप नगरसेविका सौ. धनश्री देशपांडे, प्राचार्य प्रभूजी प्रभू देशपांडे, विनोद जोशी, अनिल शास्त्री, अरुण केदार, प्रा. अविनाश सेनाड, विजय लिमये, अरविंद गरुड, संजय लोखंडे, राहुल पुराणिक, सचिन नारळे, अंजली जोशी, शिव शाहू, गजानन देशपांडे आणि डॉ. तुषार झाडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व आभारप्रदर्शन डॉ. वृषाली शिलेदार यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रवीण मुळे, महेश वाबगावकर आणि माधवी भूत यांनी विशेष परिश्रम घेतले. स्वरुची भोजन व दुग्धप्राशनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## शिक्षिका ज्योती सव्वाशेरे यांचा सेवापूर्ती सत्कार

**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी :** येथील श्री विश्वनाथ बाबा हायस्कूलमध्ये शिक्षिका ज्योती प्रकाश सव्वाशेरे यांचा सेवापूर्ती सत्कार सोहळा प्राचार्य राजेश बिडवाईक यांच्या अध्यक्षतेखाली शनिवार ३१ ऑक्टोबर रोजी पार पडला. ज्योती सव्वाशेरे यांची प्रथम नियुक्ती १९९० रोजी द्रुगधामना हायस्कूलमध्ये झाली होती.त्या शाळेत अतिरिक्त झाल्यामुळे शेवटची नोकरी श्री विश्वनाथ बाबा हायस्कूलमध्ये केली. शाळेच्या



वतीने त्यांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवाकार्याचा गौरव करून त्यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला. शिक्षण क्षेत्रातील सेवा ही केवळ नोकरी नसून विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी असते. आपल्या सेवाकाळात विद्यार्थ्यांना ज्ञानदान करण्यासोबतच त्यांच्यामध्ये शिस्त, संस्कार आणि जीवनमूल्यांची रुजवणूक करण्याचे कार्य शिक्षक करतात. अशा सेवेतून निवृत्त होणाऱ्या शिक्षकांचा सेवापूर्ती सोहळा हा शाळेसाठी अभिमानाचा आणि भावनिक क्षण असतो. असे प्रतिपादन प्राचार्य राजेश बिडवाईक यांनी केले.सत्काराला उत्तर देताना शिक्षिका सव्वाशेरे यांनी कुटुंबीय, सहकारी, विद्यार्थी आणि संस्थेने दिलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी पर्यवेक्षक राजीव वालदे, सकाळ विभाग प्रमुख प्रा. जुनेद अहमद,विवेक चौधरी, प्रा.सुधाकर लडके, संदीप उपासे, अशोक डोंगरकर, संदीप भदभुजे, बलदेव राठोड, विजय जयस्वाल, उमेश डडमल, सचिन पूणेवार, सतीश जयस्वाल, संदेश चोखाद्रि, दिलीप तळहांडे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन अशोक जांभळे यांनी तर आभार शिक्षक संदीप उपासे यांनी मानले.

## भाजपच्या जलालखेडा मंडळाचे उपाध्यक्ष मनीष काटोले यांचा राजीनामा

### ३० ऑक्टोबरला मंडळ अध्यक्षांकडे लेखी राजीनामा सुपूर्द, वैयक्तिक व्यस्ततेचे कारण, संघटनात्मक वर्तुळात चर्चेला उधाण

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

भारतीय जनता पार्टीच्या जलालखेडा मंडळातील संघटनात्मक घडामोडींना वेग आला असून, मंडळाचे उपाध्यक्ष मनीष वासुदेवराव काटोले यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. ३० ऑक्टोबर २०२६ रोजी त्यांनी मंडळ अध्यक्षांकडे लेखी स्वरूपात राजीनामा सुपूर्द केला. त्यांच्या या निर्णयामुळे जलालखेडा मंडळातील भाजपच्या राजकीय वर्तुळात चर्चेला सुरुवात झाली आहे.

पक्षाने विश्वास दाखवून उपाध्यक्षपदाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविली होती. या माध्यमातून पक्षाच्या संघटनात्मक कामकाजात योगदान देण्याची संधी मिळाली. तसेच पक्षातील वरिष्ठ नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे वेळोवेळी सहकार्य लाभले, याबद्दल काटोले यांनी राजीनामा पत्रातून आभार व्यक्त केले आहेत. मात्र, वैयक्तिक तसेच इतर अपरिहार्य व्यस्ततेमुळे आगामी काळात उपाध्यक्षपदाची जबाबदारी पूर्ण वेळ आणि सक्रियपणे सांभाळणे शक्य होणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. पक्षाने दिलेल्या जबाबदारीला योग्य वेळ देता येत नसेल, तर पदावर कायम राहणे योग्य ठरणार नाही, या भूमिकेतून आपण स्वेच्छेने राजीनामा देत असल्याचे त्यांनी पत्रात नमूद केले आहे.

विशेष म्हणजे, आपल्या वैयक्तिक व्यस्ततेचा पक्षाच्या संघटनात्मक कामकाजावर कोणताही परिणाम होऊ नये, तसेच पक्षाच्या कामात अडथळा निर्माण होऊ नये, हा राजीनाम्यामागील मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. आपला राजीनामा तातडीने मंजूर करून उपाध्यक्षपदाच्या जबाबदारीतून मुक्त करावे, अशी विनंतीही त्यांनी मंडळ अध्यक्षांकडे केली आहे.

दरम्यान, काटोले यांच्या राजीनाम्यामुळे जलालखेडा मंडळातील भाजपच्या संघटनात्मक पातळीवर नव्या चर्चेला सुरुवात झाली आहे. मंडळातील पदाधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्या, आगामी संघटनात्मक नियोजन आणि रिक्त होणाऱ्या उपाध्यक्षपदाची जबाबदारी कोणाकडे सोपविली जाणार, याकडे स्थानिक कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे. राजीनाम्यामागे काटोले यांनी वैयक्तिक व्यस्ततेचे कारण दिले असले, तरी त्यांच्या या निर्णयामुळे जलालखेडा मंडळातील भाजपच्या राजकीय आणि संघटनात्मक वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. आता पक्ष नेतृत्व याबाबत काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मधमाश्यांच्या हल्ल्यात बोरी येथील महिलेचा मृत्यू

### पारबता गोपीचंद डोंगरवार यांचे नागपूर येथे उपचारादरम्यान निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, तुमसर**

तुमसर तालुक्यातील बोरी येथील अल्पभूधारक शेतकरी महिला पारबता गोपीचंद डोंगरवार (वय ५५) या दिनांक २७ रोजी नाकाडोंगरी परिसरातून आपला शेतमाल विकून परत येत असताना रस्त्यात नाकाडोंगरी परिसरात त्यांच्यावर मधमाशांनी हल्ला केला. त्या हल्ल्यात अतिशय गंभीर जखमी झाल्यामुळे त्यांना उपचारासाठी नागपूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्यावर शासकीय रुग्णालय नागपूर येथे उपचार सुरू असताना त्यांची प्राणज्योत मावळली. मधमाशांच्या हल्ल्यात जखमी झालेल्या महिलेचा मृत्यू झाल्यामुळे बोरी परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून त्यांना शासनाकडून आर्थिक मदत मिळण्यात यावी अशी मागणी होत आहे.



## भिवापूर तालुक्यात जुनी पेन्शनच्या मागणीसाठी ३१ ऑक्टोबर 'काळा दिवस' म्हणून पाळला

### शिक्षक व कर्मचाऱ्यांनी काळी फीत लावून नोंदविला निषेध



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर/ मालेवाडा**

महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेच्या वतीने ३१ ऑक्टोबर हा दिवस काळा दिवस म्हणून पाळण्यात आला. यानिमित्त भिवापूर तालुक्यातील विविध ठिकाणी शिक्षक व कर्मचाऱ्यांनी काळी फीत लावून शासनाच्या जुन्या पेन्शन योजना बंद करण्याच्या निर्णयाचा निषेध नोंदविला. महाराष्ट्र राज्य शासनाने १ नोव्हेंबर २००५ पासून नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी जुनी पेन्शन योजना बंद करण्याचा निर्णय ३१ ऑक्टोबर २००५ रोजी घेतला होता. या निर्णयाला २१ वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर जुनी पेन्शन संघटनेच्या वतीने दरवर्षी ३१ ऑक्टोबर हा दिवस काळा दिवस म्हणून पाळण्यात येतो.

जुनी पेन्शन योजना पुन्हा लागू करण्यात यावी, या मागणीसाठी शिक्षक व कर्मचाऱ्यांनी काळी फीत लावून शासनाचे लक्ष वेधले. निवृत्तीनंतर कर्मचाऱ्यांना आर्थिक सुरक्षितता मिळावी आणि त्यांच्या भविष्याची हमी मिळावी, यासाठी जुनी पेन्शन योजना लागू करणे आवश्यक असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. भिवापूर तालुक्यातील विविध ठिकाणी शिक्षक व कर्मचाऱ्यांनी या उपक्रमात सहभागी होत जुनी पेन्शन योजनेच्या मागणीला पाठिंबा दर्शविला. शासनाने कर्मचाऱ्यांच्या मागणीचा सकारात्मक विचार करून जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत योग्य निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

# केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदकाने अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे आणि पोलीस निरीक्षक प्रभावती एकुरके सन्मानित

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर-धनंजय पांडरे**

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजलेल्या अवैध किडनी विक्री प्रकरणाचा तसेच अवैध सावकारी प्रकरणाचा यशस्वी तपास करून उल्लेखनीय कामगिरी करणारे चंद्रपूरचे अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांना भारत सरकारच्या गृह मंत्रालयाकडून सन २०२६ चे प्रतिष्ठित केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक जाहीर झाले आहे.



यासोबतच सध्या रामनगर पोलीस ठाण्यात ठाणेदार म्हणून कार्यरत असलेल्या महिला पोलीस निरीक्षक प्रभावती एकुरके यांनाही विशेष तपासातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल हे पदक प्रदान करण्यात आले आहे. या दोन्ही अधिकाऱ्यांच्या यशामुळे चंद्रपूर पोलीस दलाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.भारत सरकारच्या गृह मंत्रालयाच्या पोलीस-१ विभागाने यासंदर्भात आदेश जारी केला असून, केंद्रीय गृहमंत्री यांच्या मान्यतेने विशेष मोहीम, तपास आणि न्यायवैद्यक शास्त्र या क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांना २०२६ चे केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक जाहीर करण्यात आले आहे.

अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चेत आलेल्या अवैध किडनी विक्री प्रकरणाचा तसेच अवैध सावकारी प्रकरणाचा सखोल तपास करून महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली होती. या प्रकरणांमधील गुन्हेगारीचे स्वरूप, त्यामागील यंत्रणा आणि संबंधित आरोपींचा शोध घेण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली. त्यांच्या या उल्लेखनीय तपासकार्याची केंद्र सरकारने दखल घेत त्यांना या प्रतिष्ठित पदकाने सन्मानित केले आहे.

तर रामनगर पोलीस ठाण्याच्या ठाणेदार महिला पोलीस निरीक्षक प्रभावती एकुरके यांनी नागपूर येथे कार्यरत असताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या आलेल्या गंभीर प्रकरणाचा तपास केला होता. या प्रकरणाचा तपास करताना त्यांनी कर्नाटक राज्यातील कारागृहातून संबंधित आरोपीला अटक केली होती. या प्रकरणात दहशतवादविरोधी कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आली होती. अत्यंत संवेदनशील आणि आव्हानात्मक प्रकरणाचा यशस्वी तपास केल्याबद्दल त्यांच्या कार्याची केंद्र सरकारने दखल घेतली आहे.

महाराष्ट्रातील पोलीस दलातील अन्य अधिकाऱ्यांचाही या पुरस्कारासाठी समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये कुमार चिंता, पोलीस अधीक्षक ऋषिकेश रेड्डी, एसीपी रामेश्वर रेंगे, पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा गायकवाड, पोलीस निरीक्षक माणिक बेंद्रे, रितेश अहेर, रामचंद्र मोहिते आणि महिला पोलीस निरीक्षक अश्विनी अभिजीत पाटील यांचा समावेश आहे.

गुन्हेगारीविरोधातील प्रभावी तपास, धाडसी निर्णयक्षमता आणि कर्तव्याप्रती असलेली निष्ठा यांची दखल राष्ट्रीय स्तरावर घेतली जाणे ही अभिमानाची बाब आहे. अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे आणि महिला पोलीस निरीक्षक प्रभावती एकुरके यांच्या या सन्मानामुळे चंद्रपूर पोलीस दलाचा गौरव वाढला असून, पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून गुन्हेगारी विरोधातील प्रभावी तपास, धाडसी निर्णयक्षमता आणि कर्तव्यप्रती असलेली निष्ठा यांची दखल राष्ट्रीय स्तरावर घेतली जाणे ही अभिमानाची बाब आहे. अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे आणि महिला पोलीस निरीक्षक प्रभावती एकुरके यांच्या या सन्मानामुळे चंद्रपूर पोलीस दलाचा गौरव वाढला असून, पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. वर्षाव होत आहे.

थोडक्यात

## महाप्रज्ञा बुद्ध विहारात वर्षावास समापन सोहळा

### महापरित्राण पाठ, धम्मदेसना, भोजनदान व भीमगीतांनी परिसर धम्ममय



दै. सिंहवाणी वृत्त, वाडी

वाडी नजीकच्या न्यू शांतीनगर, दाभा येथील महाप्रज्ञा बुद्ध विहारात शनिवारी वर्षावास समापन कार्यक्रम विविध धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांनी उत्साहात संपन्न झाला. आषाढ ते अश्विन पौर्णिमेदरम्यान भदंत संघकीर्ती महाथेरो यांच्या मार्गदर्शनाखाली उपासक-उपासिकांनी बुद्ध वंदना, धम्मदेसना व ध्यानसाधना करून वर्षावास पूर्ण केला. समारोपप्रसंगी भदंत धम्मशील महाथेरो (सारनाथ) यांच्या हस्ते ध्वजारोहण व महापरित्राण पाठ घेण्यात आला. त्यानंतर भिक्खू संघाला चिवरदान, संघदान व भोजनदान करण्यात आले. तसेच हजारो उपासक-उपासिकांसाठी भोजनदान आयोजित करण्यात आले. भिक्खू संघाने धम्मदेसनेतून बुद्ध धम्माचे महत्त्व आणि समाजाची जबाबदारी याविषयी मार्गदर्शन केले.

यावेळी माजी मंत्री रमेशचंद्र बंग, आमदार विकास ठाकरे, महापौर नीता ठाकरे, अन्याय निवारण समितीच्या अध्यक्षा ज्वालाताई धोटे, नगराध्यक्ष नरेश चरडे, उपनगराध्यक्ष कल्पनाताई सगदेव, नगरसेविका दर्शनी धवड, साधना बरडे, नगरसेवक श्याम मंडपे, सरिता यादव, दिनेश कोचे, विजय मेंढे, अंकिता कापसे, शितल नंदागवळी व नरेश बरडे यांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. सामाजिक कार्यकर्ते नितेश जंगले, गौतम तिरपुडे, आशिष नंदागवळी, नंदू सोमकुवर, बबलू मेश्राम व कमलेश विजयकर यांचीही उपस्थिती होती. अमरावती येथील सुप्रसिद्ध गायक सॅविधान मनोहरे व संचाने सादर केलेल्या बुद्ध-भीमगीतांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. यानिमित्त रक्तदान, आरोग्य तपासणी व होमिओपॅथी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. समता सैनिक दलाने संपूर्ण दिवस सुरक्षा व्यवस्था सांभाळली. विदर्भासह नागपूर शहर, वाडी, डिफेन्स, लाव्हा, दाभा, दवलामेटी, आठ मैल व वडधामना परिसरातील हजारो अनुयायांनी कार्यक्रमाला उपस्थिती लावली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महाप्रज्ञा उपासक-उपासिका संघाने विशेष परिश्रम घेतले.

## फ्रॉम रेस्क्यू टू फ्रीडम : 'निसर्ग बैठक'च्या दुसऱ्या सत्राचे आयोजन आज

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

वाइल्ड अजाईल फाउंडेशनतर्फे पीव्हीएमपी आणि ग्रीन नागपूर यांच्या सहकार्याने निसर्ग बैठक या उपक्रमाचे दुसरे सत्र रविवार, दि. १ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत पूर्व विदर्भ महिला परिषद सभागृह, बर्डी, नागपूर येथे आयोजित करण्यात आले आहे. फ्रॉम रेस्क्यू टू फ्रीडम - वाइल्डलाइफ रेस्क्यू स्टोरीज अँड द सायन्स बिहाइंड इट ही या सत्राची संकल्पना आहे. या सत्रात टीटीसी नागपूरचे संस्थापक कुंदन हाते आणि पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. प्रियल चौगडे हे वन्यजीव बचावकार्य, प्राण्यांचे वर्तन, वैद्यकीय उपचार, पुनर्वसन आणि वन्यजीवांना पुन्हा त्यांच्या नैसर्गिक अधिवासात सोडण्याच्या प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करणार आहेत. वन्यजीव बचावामागील प्रत्यक्ष अनुभव आणि त्यामागील शास्त्रीय दृष्टिकोन जाणून घेण्याची संधी यानिमित्ताने मिळणार आहे. निसर्ग, वन्यजीव आणि पर्यावरणाविषयी जागरूकता वाढविण्यासाठी आयोजित या उपक्रमात वन्यजीवप्रेमी, विद्यार्थी, निसर्गप्रेमी आणि नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. सहभागासाठी १०० योगदान शुल्क असून त्यामध्ये भेटवस्तूचा समावेश आहे.

## आयुर्वेदिक उत्पादन निर्मिती प्रशिक्षणातून महिलांना स्वयंरोजगाराची संधी

### भगेमहरी येथे बचतगटातील महिलांसाठी प्रशिक्षण धन्वंतरी वन औषधी उद्यानात वृक्षारोपण



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

राष्ट्रीय आयुष मिशन अंतर्गत जिल्हा परिषद आरोग्य विभाग व आयुष्मान आरोग्य मंदिर, आयुष सालई टेकाडीच्या संयुक्त विद्यमाने आयुष ग्राम भगेमहरी येथे बचतगटातील महिलांसाठी आयुर्वेदिक उत्पादन निर्मिती प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. प्रशिक्षणामध्ये आयुर्वेदतज्ज्ञ डॉ.सुजाता लढ्ढा यांनी महिलांना घरगुती स्तरावर दर्जेदार, उपयुक्त व आरोग्यदायी आयुर्वेदिक उत्पादने तयार करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी सुवासिक उटणे, आयुर्वेदिक साबण, अभ्यंग तेल तसेच केशवर्धन तेल तयार करण्याचे प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण देण्यात आले. जिल्हा आयुष अधिकारी डॉ.राजेश शाहू यांनी महिलांना मार्गदर्शन करताना सांगितले की, आयुर्वेदिक उत्पादनांची निर्मिती व विक्री यांच्या माध्यमातून महिलांसाठी स्वयंरोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होऊ शकतात. महिलांनी अशा प्रशिक्षणाचा लाभ घेऊन लघुउद्योग सुरू करावेत आणि आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व सक्षम व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमांतर्गत श्री धन्वंतरी वन औषधी उद्यान, आयुष ग्राम भगेमहरी येथे जिल्हा कार्यक्रम अधिकारी डॉ. उत्सव शेंडे, जिल्हा आयुष अधिकारी डॉ. राजेश शाहू व इतर मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमातून आयुर्वेदाचा प्रचार व प्रसार, महिलांचे आर्थिक सक्षमीकरण आणि पर्यावरण संवर्धन या तिन्ही उद्दिष्टांना चालना देण्यात आली.

# इरई धरणातील पाणीसाठ्याचे सूक्ष्म नियोजन करा, शेवटच्या नागरिकापर्यंत पाणी पोहोचवा : आ. किशोर जोरगेवार

### जिल्हाधिकारी वसुमना पंत यांच्यासह इरई धरणाची पाहणी, दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर उपलब्ध पाण्याचा काटेकोर वापर, जलस्रोतांचे पुनरुज्जीवन आणि बंधारे बांधण्याच्या सूचना

दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर-धनंजय पांढरे



चंद्रपूर जिल्ह्यात निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता उपलब्ध पाणीसाठ्याचे योग्य नियोजन करून त्याचा काटेकोर वापर करणे आवश्यक आहे. आगामी काळातील पाण्याची गरज लक्षात घेऊन उपलब्ध पाण्याचे सूक्ष्म नियोजन करावे. कोणत्याही परिस्थितीत पाण्याचा अपव्यय होणार नाही. शेवटच्या नागरिकापर्यंत पाणी पोहोचेल, याची दक्षता प्रशासनाने घ्यावी, असे निर्देश आमदार किशोर जोरगेवार यांनी दिले. जिल्हाधिकारी वसुमना पंत यांच्यासह त्यांनी इरई धरणाची पाहणी करून उपलब्ध पाणीसाठ्याचा आढावा घेतला.

यावेळी मनपा आयुक्त नरेश अकुनरी, मुख्य अभियंता चंद्रपूर थर्मल पॉवर स्टेशन अनिल काथोये, उपविभागीय अधिकारी विशाल कुमार मेश्राम, उपायुक्त मनपा शेषराव टाले, तहसीलदार विजय पवार, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सलीम शेख, कार्यकारी अभियंता चंद्रपूर पाटबंधारे विभाग जलेश सिंग, कार्यकारी अभियंता महेश गवरी, शहर अभियंता मनपा रवींद्र हजारे यांच्यासह इतर अधिकाऱ्यांची उपस्थिती होती. तसेच यावेळी भाजपचे माजी महानगर अध्यक्ष तथा नगरसेवक सुभाष कासनगोट्टूवार, भारतीय जनता पार्टी राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य प्रकाश देवतळे, भाजपा महामंत्री नामदेव डाहुले, रविंद्र गुरनुले, मनोज पाल, गटनेते शेखर शेट्टी, जितेश कुळमेथे, बलराम डोडानी, तुषार सोम, दशरथ सिंग ठाकूर, अमोल शेंडे, प्रलय म्हशाखेत्री, प्रवीण गिलबिले यांच्या सहा कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

यावेळी धरणातील सद्यस्थितीतील पाणीसाठा, पाण्याची उपलब्धता, आगामी काळातील संभाव्य गरज आणि पाणी वितरणाच्या नियोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती पाहता पाण्याचे नियोजन करताना प्रत्येक बाबीचा गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे.

उपलब्ध पाणीसाठा किती दिवस पुरू शकेल, विविध क्षेत्रांसाठी किती पाण्याची आवश्यकता आहे आणि त्यानुसार वितरण कसे करावे, याचे स्पष्ट नियोजन प्रशासनाने तयार करावे. पाणीपुरवठ्याच्या नियोजनात कोणत्याही भागावर अन्याय होणार नाही, याचीही दक्षता घेण्याच्या सूचना आमदार जोरगेवार यांनी यावेळी केल्या. केवळ धरणातील उपलब्ध पाण्यावर अवलंबून न राहता इतर जलस्रोतांचे पुनरुज्जीवन करण्यासाठीही विशेष प्रयत्न होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. अनेक ठिकाणी पाण्याचे नैसर्गिक स्रोत असूनही योग्य देखभाल आणि संवर्धनाअभावी ते निष्क्रिय झाले आहेत. अशा जलस्रोतांची ओळख करून त्यांना पुन्हा प्रवाहित करण्यासाठी आवश्यक कामे हाती घ्यावीत. नद्या, नाले आणि ओढ्यांमधील पाणी अडवून त्याचा साठा वाढविण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशा सूचनाही यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी प्रशासनाला केल्या आहे.

जिल्ह्यात ज्या ठिकाणी बंधारे बांधणे शक्य आहे, त्या ठिकाणांची पाहणी करून बंधाऱ्यांच्या उभारणीचे नियोजन करावे. शक्य तिथे बंधारा या भूमिकेतून पावसाचे वाहून जाणारे पाणी अडविण्याला प्राधान्य द्यावे. यामुळे भूजलपातळी वाढण्यास मदत होण्यासोबतच भविष्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठीही हातभार लागेल. यासोबतच पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिन्यांमधील गळती शोधून ती तातडीने दुरुस्त करावी. वितरण व्यवस्थेतील पाण्याचे नुकसान कमी करून उपलब्ध पाण्याचा अधिकाधिक उपयोग नागरिकांसाठी करता येईल, अशा उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

इरई धरणातून होणारी वीजनिर्मिती आणि नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची गरज या दोन्ही बाबी महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे वीजनिर्मिती प्रक्रियेला बाधा न आणता पिण्याच्या पाण्याच्या गरजेचा समतोल राखणारे नियोजन करण्यात यावे. यासाठी संबंधित विभागांनी एकमेकांशी समन्वय साधून निर्णय घ्यावेत. पाणी वितरण करताना शेवटच्या टोकावरील वस्त्यांपर्यंत नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा होईल, याची खबरदारी घ्यावी, असे आमदार जोरगेवार यांनी स्पष्ट केले.

दुष्काळी परिस्थितीत पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर होण्याची शक्यता लक्षात घेता प्रशासनाने आतापासूनच आवश्यक खबरदारी घेणे गरजेचे आहे. तात्पुरत्या उपाययोजनांसोबतच भविष्यात पाण्याची उपलब्धता वाढविणार्या दीर्घकालीन कामांनाही गती द्यावी. पाणी अडविणे, पाण्याचे संवर्धन, जलस्रोतांचे पुनरुज्जीवन आणि वितरण व्यवस्थेतील त्रुटी दूर करणे या सर्व बाबींचा एकत्रित विचार करून कृती आराखडा तयार करावा. उपलब्ध पाण्याचे योग्य व्यवस्थापन आणि सर्व विभागांमधील समन्वयातून जिल्ह्यातील नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये, यासाठी प्रशासनाने नियोजनबद्ध पावले उचलावीत, असेही आमदार किशोर जोरगेवार यांनी यावेळी सांगितले.

## ५८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त, एकाला अटक

**ठाणे :** राज्यात सध्या अन्न व औषध प्रशासन विभागाकडून जोरदार कारवाई सुरू असून सनदी अधिकारी तुकाराम मुंढेंच्या नेतृत्वात विभागाने गेल्या तीन महिन्यांत मोठ्या प्रमाणात मुद्देमालही जप्त केला आहे. त्यामध्ये, प्रतिबंधित गुटख्यावरही कारवाई करण्यात आली असून तंबाखुजन्य पदार्थही जप्त करण्यात आला आहे. त्यातच, आता महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेल्या गुटखा आणि पान मसाल्याची अवैध वाहतूक करणाऱ्यांविरोधात भिवंडीत मोठी कारवाई करण्यात आली आहे. नारपोली पोलिस आणि अन्न व औषध प्रशासनाने संयुक्त कारवाई करत काल्हेर येथील अरिहंत कंपाउंड परिसरातून तब्बल ५७ लाख ९६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीस आणि एफडीएच्या या संयुक्त कारवाईत लाखो रुपयांचा प्रतिबंधित गुटखा आणि वाहतुकीसाठी वापरण्यात आलेल्या टाटा टेम्पोचा समावेश असून, या प्रकरणी लियाकत साबीर अली ( वय ३९ ) या आरोपीला अटक करण्यात आली आहे. भिवंडीतील काल्हेर येथील अरिहंत कंपाउंड परिसरात टाटा टेम्पोमधून प्रतिबंधित गुटख्याची वाहतूक होत असल्याची गुप्त माहिती नारपोली पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे नारपोली पोलिस आणि अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने संयुक्तपणे छापा टाकला.

## चाचेर येथे आज कोजागिरी महोत्सवाचा उत्साह, रक्तदान, मोफत नेत्रतपासणी व 'संतान' नाटकाची मेजवानी

दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मोदा

परमात्मा एक सेवक मंडळ शाखा चाचेर यांच्या वतीने महानत्यागी बाबा जुमदेवजी यांच्या आदेशानुसार आणि मार्गदर्शक धर्मराज बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली कोजागिरी महोत्सवाचे आयोजन रविवार (ता. १ नोव्हेंबर) रोजी करण्यात आले आहे. या महोत्सवानिमित्त धार्मिक, सामाजिक, आरोग्यविषयक तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे.

महोत्सवाच्या पूर्वतयारीचा एक भाग म्हणून आज शनिवार (तारीख ३१ ऑक्टोबर) रोजी रात्री ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानात सेवक-सेविकांनी सहभागी होऊन स्वच्छतेचा संदेश देण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.



रविवारी सकाळी ९ ते १० या वेळेत हवन कार्य, त्यानंतर सकाळी १० ते १०.३० वाजेपर्यंत भगवंत व महानत्यागी बाबा जुमदेवजी यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात येईल. सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत भगवत कार्याच्या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले असून त्यानंतर तीर्थप्रसाद व सामूहिक भोजनाचा कार्यक्रम होणार आहे.

**रक्तदान व मोफत नेत्रतपासणी शिबिराचे आयोजन**

सामाजिक बांधिलकी जपत सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचबरोबर अत्याधुनिक मशीनद्वारे नागरिकांची मोफत नेत्रतपासणी करण्यात येणार आहे. नागरिकांनी या आरोग्यविषयक उपक्रमाचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

**'संतान' नाटक ठरणार महोत्सवाचे विशेष आकर्षण**

महोत्सवाची सांगता सांस्कृतिक कार्यक्रमाने होणार असून, रात्री ८ ते ११ या वेळेत युवा रंगमंच, वडसा प्रस्तुत युवराज प्रधान निर्मित तीन अंकी संतान या नाटकाचे सादरीकरण करण्यात येणार आहे. या नाट्यप्रयोगाचा लाभ घेण्यासाठी परिसरातील रसिक प्रेक्षकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

सदर सर्व कार्यक्रम प.पू. परमात्मा एक सेवक मंडळ, मानव मंदिर शाखा झ चाचेर येथे पार पडणार आहेत. महोत्सवात समस्त सेवक-सेविका, बालसेवक, युवा सेवक तसेच परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजक परमात्मा एक सेवक मंडळ शाखा - चाचेर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## टेलिकॉम नगरात शारदा देवी व माता राणीला भावपूर्ण निरोप

दै. सिंहवाणी वृत्त, वर्धा

टेलिकॉम नगर परिसरात नवरात्रोत्सवानंतर शारदा देवी आणि माता राणीच्या मूर्तींचे अत्यंत उत्साहपूर्ण व भक्तिमय वातावरणात विसर्जन करण्यात आले. ढोल-ताशांचा दणदणाट, भक्तांचा उत्स्फूर्त सहभाग आणि जय माता दीच्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला होता. विसर्जनानिमित्त टेलिकॉम कॉलनीत आकर्षक आणि मनमोहक मिरवणूक काढण्यात आली. सजविलेल्या मूर्तींचा दर्शनासाठी तसेच मिरवणुकीचे विहंगम दृश्य पाहण्यासाठी स्थानिक नागरिकांनी रस्त्याच्या दुतर्फा मोठी गर्दी केली होती. लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांनी उत्साहाने या धार्मिक सोहळ्यात सहभाग नोंदविला.



पारंपरिक पद्धतीने पूजा-अर्चना आणि आरती करण्यात आली. त्यानंतर आपल्या लाडक्या मातेला निरोप देताना अनेक भक्तांचे डोळे पाणावले. भक्तिमय वातावरणात आणि माता राणीच्या जयघोषात विसर्जन सोहळा पार पडला. शारदा देवीच्या मूर्तीच्या स्थापनेपासून ते विसर्जनापर्यंत कॉलनीतील महिला मंडळांनी विशेष उत्साहाने सहभाग घेतला. या धार्मिक उत्सवाच्या यशस्वी आयोजनात समाजसेविका साधनाताई सराफ, सुहासताई, शेंडेताई, साबळेताई, टिपलेताई यांच्यासह कॉलनीतील अनेक महिलांनी सक्रिय सहभाग घेतला. सर्वांनी एकत्र येऊन विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करत लाडक्या मातेला भावपूर्ण निरोप दिला. नवरात्रोत्सवाच्या संपूर्ण कालावधीत टेलिकॉम नगर परिसरात भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाचे वातावरण अनुभवायला मिळाले. विसर्जन सोहळ्याने या उत्सवाची भावपूर्ण आणि मंगलमय सांगता झाली.

# टाकाऊ कापडापासून कापडी पिशव्या निर्मिती; प्लास्टिकमुक्त परिसरासाठी विद्यार्थ्यांचे पहिले पाऊल!

### जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, तोंडली येथे आनंददायी शनिवार अंतर्गत शिवणकलेचा अभिनव उपक्रम

दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मोदा



विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देत त्यांच्यामध्ये स्वावलंबन, सर्जनशीलता आणि पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करण्यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, तोंडली येथे आनंददायी शनिवार अंतर्गत टाकाऊ कापडापासून कापडी पिशव्या तयार करण्याचा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. मुख्याध्यापिका अनुराधा धुर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या उपक्रमात विद्यार्थ्यांनी स्वतः सुई-दोऱ्याच्या साहाय्याने सुंदर कापडी पिशव्या शिवून आपल्या कलाकौशल्याची प्रचिती दिली.

शिवणकलेची सुरुवात होते ती सुईत दोरा ओवण्यापासून! सुईमध्ये दोरा ओवणे, कापड व्यवस्थित पकडणे, एकाग्रतेने शिलाई करणे आणि सरळ रेषेत टाके घालत पिशवीला सुबक आकार देणे, या प्रत्येक टप्प्यात विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला.

सुईत दोरा ओवण्यापासून ते कापडाच्या तुकड्यांना टाक्यांनी जोडण्यापर्यंत विद्यार्थ्यांनी संयम, एकाग्रता आणि चिकाटीचा अनुभव घेतला. सर्व विद्यार्थ्यांनी सुंदर व सरळ रेषेत शिलाई करून आकर्षक कापडी पिशव्या तयार केल्या.

या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे टाकाऊ कापडाचा पुनर्वापर करून उपयुक्त वस्तू तयार करण्याची संकल्पना विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष कृतीतून अनुभवली. बाजारातून किराणा माल आणताना, भाजीपाला खरेदी करताना तसेच दैनंदिन जीवनातील विविध कामांसाठी प्लास्टिकच्या पिशव्यांना पर्याय म्हणून कापडी पिशव्यांचा वापर करता येतो, हे विद्यार्थ्यांना समजले. टाकाऊतून टिकाऊ आणि कृतीतून पर्यावरण संवर्धन हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

या उपक्रममुळे विद्यार्थ्यांमध्ये हातांचे सूक्ष्म कौशल्य, एकाग्रता, संयम, अचूकता, सर्जनशीलता आणि स्वावलंबन विकसित होण्यास मदत झाली. तसेच पुनर्वापराचे महत्त्व, कचरा व्यवस्थापन आणि पर्यावरण संवर्धन याविषयी जागरूकता निर्माण झाली. केवळ पुस्तकातून पर्यावरण संवर्धनाचे धडे न देता प्रत्यक्ष कृतीतून पर्यावरणपूरक सवयी रुजविण्याचा स्तुत्य प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. प्लास्टिकमुक्त परिसर निर्माण करण्यासाठी स्वतःपासून सुरुवात करण्याचा निर्धारही विद्यार्थ्यांनी व्यक्त केला.

या उपक्रमाच्या वेळी सहशिक्षक निलेश जाधव उपस्थित होते.

अशा प्रकारे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, तोंडली येथे राबविण्यात आलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांना शिवणकलेची प्राथमिक ओळख करून देणारा, स्वावलंबनाचे धडे देणारा आणि पर्यावरण संवर्धनासाठी कृतीशील बनविणारा प्रेरणादायी उपक्रम ठरला.

थोडक्यात

## नुक्कड नाटकाद्वारे जैविक प्रतिजैविक प्रतिरोधाबाबत जनजागृती

**अँटिबायोटिक औषधांच्या अनावश्यक व अतिवापराचे दुष्परिणाम विद्यार्थ्यांनी नाट्यप्रयोगातून दिले पटवून**



**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली आणि भवभूती शिक्षण संस्थेद्वारे संचालित श्री लक्ष्मणराव मानकर इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, आमगाव यांच्या संयुक्त विद्यमाने जैवप्रतिजैविक प्रतिरोध (अँटिमायक्रोबियल रेझिस्टन्स) या महत्त्वपूर्ण विषयावर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी आमगाव शहराच्या मुख्य बाजारपेठेत नुक्कड नाटक सादर करून नागरिकांमध्ये जनजागृती केली.

सध्याच्या काळात प्रतिजैविक औषधांचा अनावश्यक आणि अयोग्य वापर ही आरोग्य क्षेत्रासमोरील गंभीर समस्या बनत आहे. विशेषतः डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय स्वतःहून औषधे घेणे, अपुऱ्या माहितीच्या आधारे अँटिबायोटिक्सचा वापर करणे तसेच उपचारादरम्यान औषधांचा निर्धारित कालावधी पूर्ण न करणे अशा कारणांमुळे प्रतिजैविक प्रतिरोधाची समस्या वाढत आहे. परिणामी, जिवाणूंवर प्रतिजैविक औषधांचा अपेक्षित परिणाम होत नाही आणि संसर्गजन्य आजारांवरील उपचार अधिक कठीण होण्याची शक्यता निर्माण होते.

## श्री स्वामी विवेकानंद पब्लिक स्कूलमध्ये कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर उत्साहात



**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

तालुका विधी सेवा समिती तथा दिवाणी न्यायालय, आमगाव आणि वकील संघ, आमगाव यांच्या संयुक्त विद्यमाने 'कॉमन मिनिमम प्रोग्राम' अंतर्गत शनिवार, दिनांक ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी श्री स्वामी विवेकानंद पब्लिक स्कूल, रिसामा येथे कायदेविषयक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती स्मृती आर. छपरिया होत्या. यावेळी आमगाव वकील संघाचे सर्व सदस्य, सरकारी अभियोक्ता तसेच न्यायालयातील कर्मचारी वर्ग प्रमुख उपस्थित होते. या शिबिरात विद्यार्थ्यांना विविध कायदेशीर विषयांवर तज्ज्ञ वकिलांनी मार्गदर्शन केले. ॲड. श्री. व्ही. डी. रहांगडाले यांनी विद्यार्थ्यांना ड्रंकड्रग कायद्याबाबत माहिती देत बालकांच्या संरक्षणासाठी असलेल्या कायदेशीर तरतुदी समजावून सांगितल्या.

ॲड. श्री. बी. आर. मेंढे यांनी शिक्षणाचा अधिकार या विषयावर मार्गदर्शन केले. ॲड. श्री. यू. बी. नागपुरे यांनी सुरक्षित बचपन अभियानाची माहिती देत बालकांच्या सुरक्षिततेचे महत्त्व पटवून दिले. तर ॲड. श्री. एस. पी. सिहोरे यांनी सायबर गुन्हे या विषयावर मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना इंटरनेट व डिजिटल माध्यमांचा सुरक्षित वापर करण्याबाबत जागरूक केले. या मार्गदर्शन शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपले कायदेशीर अधिकार, कर्तव्ये, बालसुरक्षा तसेच सायबर गुन्ह्यांपासून बचाव करण्याबाबत महत्त्वपूर्ण माहिती मिळाली. विद्यार्थ्यांमध्ये कायद्याविषयी जागरूकता निर्माण करणे आणि त्यांना सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रुती गुप्ता यांनी केले. हेमलता शिवणकर यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले, तर सारिका श्रीवास्तव यांनी आभार प्रदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या कायदेविषयक ज्ञानात भर घालणारे हे शिबिर अत्यंत माहितीपूर्ण व मार्गदर्शक ठरले.

## शिरपूर बोरी येथे रात्री ६ फुट विषारी नागाचा थरार, सर्पमित्र सागर धावडेकडून रेस्क्यू



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

तालुक्यातील शिरपूर बोरी येथे मध्यरात्री एका ६ फुट लांबीच्या अत्यंत विषारी नागाला (कोब्रा) सुरक्षितरीत्या पकडून जीवनदान देण्यात आले. ही थरारक घटना ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री ३:३० वाजताच्या सुमारास घडली. मिळालेल्या माहितीनुसार, शिरपूर बोरी येथील रहिवासी अनिल मडावी यांच्या परिसरात मध्यरात्री अचानक एक भलामोठा नाग आढळून आला. रात्रीच्या अंधारात तब्बल ६ फुट लांबीचा विषारी नाग समोर दिसल्याने कुटुंबाची चांगलीच घाबरगुंडी उडाली. मडावी यांनी तात्काळ प्रसंगावधान राखत स्थानिक सर्पमित्र सागर धावडे यांच्याशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच सर्पमित्र सागर धावडे यांनी कोणतीही दिरंगाई न करता मध्यरात्रीच घटनास्थळ गाठले. अत्यंत शिताफीने आणि काळजीपूर्वक कोणताही अनुचित प्रकार न घडू देता त्यांनी या ६ फुटी विषारी नागाला सुरक्षितरीत्या रेस्क्यू (ताब्यात) केले. नाग सुरक्षितपणे पकडला गेल्याने अनिल मडावी यांच्या कुटुंबासह संपूर्ण गावकऱ्यांनी सुटकेचा श्वास सोडला. मध्यरात्रीच्या वेळी जीवाची पर्वा न करता तात्काळ धावून येत वन्यजीवाला जीवनदान दिल्याबद्दल सर्पमित्र सागर धावडे यांचे परिसरात कौतुक होत आहे. या रेस्क्यू केलेल्या नागाला वनविभागाच्या मार्गदर्शनाखाली सुरक्षित नैसर्गिक अधिवासात (जंगलात) सोडण्यात येणार असल्याचे समजते.

# २१ कि.मी महिलागटात आंतरराष्ट्रीय धावपटू तसेहाय ओहावा, तर पुरुष गटात नागपूरचा राजन यादव अव्वल

**मनपाच्या युनिटी मॅरेथॉन स्पर्धेला उदंड प्रतिसाद, दहा हजाराहून अधिक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय धावपटूंचा सक्रीय सहभाग**

### सरदार वल्लभभाई पटेल (कच्छीविसा) मैदानात रंगला राष्ट्रीय एकतेचा सोहळा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

देशाचे पहिले गृहमंत्री, उपपंतप्रधान, भारतरत्न 'लोहपुरुष' सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीचे औचित्य साधून नागपूर महानगरपालिकेच्या वतीने शनिवारी (ता.३१) भव्य ह्युयुनिटी रन मॅरेथॉन्ह स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. लकडगंज येथील सरदार वल्लभभाई पटेल मैदान (कच्छीविसा) येथून सुरू झालेल्या या मॅरेथॉनमध्ये दहा हजाराहून अधिक धावपटू यांनी सहभाग नोंदवीत राष्ट्रीय एकता व अखंडतेचा संदेश दिला. विशेष म्हणजे, मॅरेथॉन स्पर्धेतील २१ किमी महिला खुल्या गटात इथोपिया येथील आंतरराष्ट्रीय धावपटू तसेहाय ओहावा हिने अव्वल स्थान पटकाविले, तर पुरुष खुल्या गटात नागपूरच्या राजन यादव याने बाजी मारली. स्पर्धेत नागपूरसह नाशिक, सोलापूर, चंद्रपूर, अमरावती, रत्नागिरी, राजस्थान, छत्तिसगढ, नवी दिल्ली, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश आदी राज्यातून धावपटू यांनी सहभाग नोंदविला. मॅरेथॉन स्पर्धेला पहाटे मान्यवरांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, आमदार श्री कृष्णा खोपडे, महापौर निता ठाकरे, उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे, सत्तापक्ष नेते तथा युनिटी मॅरेथॉनचे संयोजक नरेंद्र (बाल्या)बोरकर, मनपा आयुक्त डॉ. विपीन, अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम, क्रीडा विशेष समिती सभापती दर्शनी धवडयांच्यासह इतर अधिकारी व पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

**एकात्मतेचा संदेश समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचेल : डॉ. पंकज भोयर**

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करीत राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी नागपूर महानगरपालिकाद्वारा देशाचे पहिले गृहमंत्री लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त आयोजित युनिटी मॅरेथॉनच्या उपक्रमाचे कौतुक केले. त्यांनी सांगितले की, मागील काहीवर्षात क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले जात असून, ग्रामीण व शहरी भागातील युवकांना क्रीडा क्षेत्रात संधी उपलब्ध व्हावी, या उद्देशाने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. विशेष म्हणजे, केंद्र शासनाने क्रीडा क्षेत्रासाठी अधिकची आर्थिक तरतुदी केल्यामुळे आधुनिक क्रीडा साहित्य व उपकरणे उपलब्ध करून देणे शक्य झाले आहे. आजची तरुण पिढी क्रीडा क्षेत्राशी जोडली जात असल्याने नशामुक्त भारताच्या संकल्पनेला सकारात्मक दिशा मिळत आहे. वध्यांत कबड्डी असो किंवा नागपुरातील कुस्ती, विविध



खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी महापौर आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे भव्य आयोजनासाठी अभिनंदन करीत, युनिटी मॅरेथॉनच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या भव्य क्रीडा सोहळ्याचे रंगतदार व ओघवते सूत्रसंचालन मनपाचे जनसंपर्क अधिकारी श्री. मनिष सोनी व आर.जे. आमोद यांनी संयुक्तपणे केले. संपूर्ण परिसरात 'भारत माता की जय' 'च्या घोषणांनी वातावरण देशभक्तीमय झाले.

**झुम्बा आणि संगीताने उजळली पहाट**

युनिटी रन मॅरेथॉनदरम्यान विविध वयोगटांतील स्पर्धकांना शारीरिकदृष्ट्या सज्ज करण्यासाठी फॅब फिटनेसच्या श्रीमती अपराजिता, श्रीमती श्रद्धा अग्रवाल, श्रद्धा ठाकरे आणि नमिता बकाने यांनी झुंबा व्यायाम प्रकाराच्या माध्यमातून वॉर्मअप सत्र घेतले. यामुळे स्पर्धकांमध्ये नवचैतन्य आणि उत्साह निर्माण झाला. तसेच, सियाराम सनोदिया यांनी आपल्या सुमधुर आवाजात विविध गाण्यांचे सादरीकरण करून स्पर्धेसाठी उपस्थित खेळाडूंचे मनोरंजन केले आणि त्यांचा उत्साह द्विगुणित केला.

**विविध वेशभूषामध्ये दिसले चिमुकले**

नागपूर महानगरपालिकेच्या वतीने वेशभूषा स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत ७ वर्षीय चि. आहान देशमुख याने प्रभू श्रीरामचंद्र, तर ३ वर्षीय चि. आरिव देशमुख याने लक्ष्मणाची वेशभूषा साकारली. तसेच, चि. ओमक्रिश खोरगडे याने स्वातंत्र्य भारताने पहिले गृहमंत्री भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल, तर चि. अद्वैत रेवतकर याने संत शिरोमणी तुकाराम महाराज यांची वेशभूषा साकारली. याशिवाय, कु. यशिका शेंडे आणि कु. धनश्री बावनथडे यांनी आकर्षक वेशभूषा साकारून उपस्थितांचे लक्ष वेधले. या सर्व चिमुकल्यांनी साकारलेल्या विविध महापुरुषांच्या व ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांच्या वेशभूषेचे उपस्थितांनी कौतुक केले.

**८४ वर्षांचे आजोबा ते चिमुकल्यांचा अभूतपूर्व उत्साह**

या युनिटी रनचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे ८४ वर्षांचे ज्येष्ठ धावपटू श्रीपाद बुरडे यांनी अत्यंत जिद्दीने ही मॅरेथॉन पूर्ण केली. त्यांच्या या ऊर्जेचे सर्व मान्यवरांनी टाळ्यांच्या गजर करून कौतुक केले.

**धनश्री दाभाडे ठरली बजाज चेतकची मानकरी**

मॅरेथॉनमध्ये सहभागी झालेल्या धावपटूंचा उत्साह वाढवण्यासाठी विशेष लकी ड्रॉ काढण्यात आला. यात आकर्षक असे बक्षीस देण्यात आले. यात धनश्री दाभाडे ही बजाज चेतकची मानकरी ठरली.

**स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे**

युनिटी रन मॅरेथॉन स्पर्धा २१. कि.मी. पुरुष व महिला (खुला), १० कि.मी. पुरुष वखुला गट, ५.३ कि.मी. महिला खुला गट, ५.३ कि.मी. १६ वर्षाखालील मुले, २.५ कि.मी. १६ वर्षाखालील मुली तसेच सर्वांसाठी २.५ कि.मी. घेण्यात आली. यातील नागपूरसह नाशिक, सोलापूर, चंद्रपूर, अमरावती, रत्नागिरी राजस्थान, छत्तिसगढ, नवी दिल्ली, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश आदी राज्यातून धावपटू यांनी सहभाग नोंदविला.

**२१. कि.मी. पुरुष व महिला (खुला),**

**पुरुष गट:**

प्रथम : राजन यादव(नागपूर) ( वेळ : १ तास १.५८ मी. )

द्वितीय : सतीश कुमारवर्मा(उत्तर प्रदेश) (वेळः १ तास ०२.२४ मी)

तृतीय : मुकेश भानू(राजस्थान) (वेळः १ तास ३.०५ मी)

**महिला गट :**

प्रथम : तसेहाय ओहावा (इथोपिया आफ्रिका) ( वेळ : १ तास १५.०२ मी. )

द्वितीय : यामिनी ठाकरे ( नागपूर) (वेळः १ तास १६.१८ मी)

तृतीय : साक्षी ...(रत्नागिरी ) (वेळः १ तास १७.४२ मी.)

**१० कि.मी. पुरुष गट**

पुरुष गट:

प्रथम : गौरव खोडतकर(नागपूर) (वेळ : 29.20 मी. )

द्वितीय : धीरजकुमार नाशिक (वेळः २९.२२ मी)

तृतीय : अरविंद यादव ( 29.32 मी.)

**५.३ कि.मी. १६ वर्षाखालील मुले**

प्रथम : सुमित मेश्राम (उमरेड) (वेळ : १७.११ मी . )

द्वितीय :नैतिक राठोड(पुसद) (वेळः १७.२० मी)

तृतीय : रामदेव दिवाकर (वेळ १७. २५ मी)

**५.३ कि.मी. महिला खुला गट**

प्रथम : मिताली भोयर (नागपूर) (वेळ : १९.०१ मी . ) द्वितीय :शिवानी दिवाकर ( नाशिक) (वेळः १९.०८ मी) तृतीय :प्रणाली शेगावकर(शेगाव) (वेळ १९.२०मी)

**२.५ कि.मी. मुली**

प्रथम : हिमांशी बावणे (नागपूर) (वेळ : ०९.०९ मी . )

द्वितीय :सलिया खान (यवतमाळ) (वेळः ०९.१३ मी) तृतीय : लावण्या नगरकर (चंद्रपूर) (वेळ ०९.१९मी)

# 'रसिकोत्सव मराठी सहावे साहित्य संमेलन २०२६' नागपूर येथे आयोजित

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

२१ नोव्हेंबर २०२६ रोजी नागपूर येथे शुभंकरोति साहित्य परिवार च्या माध्यमातून रसिकोत्सव मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन होत आहे. विदर्भाचे सांस्कृतिक नेते आणि समाजसेवक रसिकाग्रणी डॉ. गिरीश गांधी संमेलनाध्यक्षपदी राहणार असून, उद्घाटक म्हणून इमव्हर्स ए-आयच्या संस्थापक अध्यक्ष आणि साहित्य रसिक प्रीती रामकृष्णन राहतील.

प्रामाणिक साहित्य रसिक हा अव्यक्त प्रतिभावंतच असतो अशी भूमिका घेणारे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे महाकवी डॉ. सुधाकर गायधनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. नवोदित साहित्यिकांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देत मराठी साहित्याचा प्रचार, प्रसार आणि



डॉ. गिरीश गांधी



प्रीती रामकृष्णन



डॉ. सुधाकर गायधनी

वाचनसंस्कृतीचा संवर्धनासाठी कार्यरत असलेल्या शुभंकरोति साहित्य परिवार मुंबई, या संस्थेच्या वतीने या राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. रसिकोत्सव २०२६ असे या संमेलनाचे नामकरण करण्यामागची भूमिका म्हणजे साहित्य रसिकांमधूनच या संमेलनाचे अध्यक्ष, उद्घाटक या मान्यवरांची निवड करण्यात आली आहे. संमेलनाच्या स्वागताध्यक्षापदी डॉ. माया दिलीप यावलकर राहतील.

कविसंमेलनाच्या अध्यक्षपदी श्रीनिवास नार्वेकर, तर गझलरंग कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी कोकण विभाग पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय हंडोरे पाटील हे मान्यवर राहतील.

याप्रसंगी साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय रसिक आणि साहित्यिकांच्या योगदानाची दखल घेत सहा मान्यवरांना 'शुभंकरोति गुणगौरव पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात येणार आहे. यामध्ये मुंबईच्या राजश्री पाटील, सना पंडित, डॉ. मेधा कानेटकर, न्यायमूर्ती किशोर रोही, डॉ. मीना सु. बंदे आणि धनश्री कि. पाटील यांचा समावेश आहे. वाचनाची आवड जोपासण्यासाठी आणि वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी शुभंकरोति साहित्य परिवारातर्फे महिनाभर वाचनयात्रा हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमातील उल्लेखनीय सहभागाच्या आधारे वाचकांना वाचनरत्न पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात येणार आहे.

वाशिवाय महाकवी डॉ. सुधाकर गायधनी यांच्या महाकाव्य समग्र देवदूत या जगप्रसिद्ध महाकाव्याचे समूहामध्ये अभिवाचन करणाऱ्या मान्यवरांचाही याप्रसंगी सत्कार करण्यात येईल. समूहात सातत्याने उत्तम कार्य करणाऱ्या आणि आपल्या लेखनातून साहित्यसेवा करणाऱ्या गुणीजनांनाही पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. मराठीचे वैभव संत गाडगेबाबा, श्री चक्रधर स्वामी आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या या पावन विदर्भभूमीत होणाऱ्या या साहित्य संमेलनाच्या माध्यमातून साहित्यिक, पत्रकार, कवी, गझलकार, वाचक आणि साहित्य रसिकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. नवोदित साहित्यिकांना प्रोत्साहन देणे, वाचनसंस्कृती रुजविणे आणि मराठी साहित्याची समृद्ध परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे, हा या संमेलनाचा प्रमुख उद्देश आहे शुभंकरोति साहित्य परिवाराच्या संस्थापिका आणि प्रमुख मार्गदर्शीका सोनाली जगताप, मुख्य प्रशासिका डॉ. माया दि. यावलकर, अध्यक्षा प्रा. सुमती पवार आणि प्रशासक मंडळाच्या मार्गदर्शनाखाली संमेलनाची तयारी अतिशय उत्साहाने सुरू आहे. विदर्भ-नागपूरातील साहित्यप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन रसिकोत्सव २०२६ यशस्वी करावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# आ. सुधीर मुनगंटीवारांच्या पुढाकाराने लाकूड वाहतूक कामगारांना दिवाळीपूर्वी थकीत मंजुरी

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर-धनंजय पांढरे**

बल्लारपूर येथील लाकूड वाहतूक कामगारांच्या अनेक महिन्यांपासून प्रलंबित असलेल्या मजुरीचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी या प्रकरणात तातडीने लक्ष घालत वनमंत्री गणेश नाईक यांना पत्र पाठविले. तसेच वन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव खंदारे यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली. त्यांच्या पाठपुराव्यामुळे एप्रिल ते ऑगस्ट या पाच महिन्यांची थकीत मजुरी कामगारांना प्राप्त



झाली असून, सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्यांची मजुरीही उपलब्ध झाली आहे. त्यामुळे दिवाळीच्या तोंडावर आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या कामगारांच्या कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे.

बल्लारपूर येथील वाहतूक विपणन विभागांतर्गत डेपोमध्ये कार्यरत लाकूड वाहतूक कामगारांची अनेक महिन्यांची मजुरी थकीत होती. त्यामुळे कामगारांच्या कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवले होते. दसरा सणही मजुरीविना गेल्याने दिवाळीचा सणही आर्थिक अडचणीत जाण्याची भीती कामगारांना सतावत होती. अखेर या प्रश्नावर आंदोलन करण्याच्या तयारीत असलेल्या कामगारांनी आपली व्यथा भाजपा कामगार मोर्चाचे प्रदेश महासचिव अजय दुबे यांच्याकडे मांडली. दुबे यांनी तातडीने ही बाब आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या निदर्शनास आणून दिली.

कामगारांच्या कष्टाचा मोबदला वेळेत मिळणे हा त्यांचा हक्क असल्याची भूमिका घेत आमदार मुनगंटीवार यांनी या प्रकरणात हस्तक्षेप केला. त्यांनी वनमंत्री गणेश नाईक यांना पत्र पाठवून एप्रिल ते ऑगस्ट या कालावधीतील थकीत मजुरी तातडीने देण्याची मागणी केली. तसेच वन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव खंदोरे यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करून कामगारांच्या प्रश्नाचे गांभीर्य त्यांच्या निदर्शनास आणून दिले. केवळ थकीत मजुरीच नव्हे, तर सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्यांची मजुरीही उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी पाठपुरावा केला.

या प्रयत्नांना यश आले असून, एप्रिल ते ऑगस्ट या पाच महिन्यांची थकीत मजुरी कामगारांना मिळाली आहे. तसेच सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्यांची मजुरीही उपलब्ध झाल्याने कामगारांची आर्थिक कोंडी दूर झाली आहे. दिवाळीच्या सणापूर्वीच हा प्रश्न मार्गी लागल्याने कामगारांच्या कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळाला आहे.

कामगारांच्या रोजच्या उदरनिर्वाहासह मुलांचे शिक्षण, घरखर्च आणि कुटुंबाच्या गरजा त्यांच्या मजुरीवर अवलंबून असतात. त्यामुळे कष्टाचा मोबदला वेळेवर मिळणे आवश्यक आहे. या प्रश्नाची दखल घेऊन पाठपुरावा करणारे आमदार सुधीर मुनगंटीवार आणि कामगारांची व्यथा त्यांच्यापर्यंत पोहोचविणारे भाजपा कामगार मोर्चाचे प्रदेश महासचिव अजय दुबे यांचे कामगारांनी आभार मानले. दिवाळीपूर्वी थकीत मजुरी मिळाल्याने कामगारांच्या कुटुंबीयांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

थोडक्यात

## रामटेक कृषी उत्पन्न बाजार समितीत धान खरेदी-विक्रीचा बुधवारी ४ नोव्हेंबरला शुभारंभ

### शेतकरी व व्यापाऱ्यांनी बाजार आवारातच धान विक्री करा : सभापती सचिन किरपान

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

रामटेक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने बुधवार, दिनांक ४ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी १२ वाजता बाजार समितीच्या रामटेक येथील मुख्य आवारात धान खरेदी-विक्रीचा शुभारंभ करण्यात येणार आहे. यानिमित्ताने समितीच्या वतीने काटापूजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, या कार्यक्रमाला सर्व शेतकरी, आडतिया व व्यापारी बांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन रामटेक कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सचिन किरपान यांनी केले आहे. शेतकऱ्यांनी आपल्या शेतमालाची विक्री बाजार समितीच्या शितलवाडी, रामटेक येथील आवारात करावी. येथे शेतमालाला योग्य भाव, योग्य वजनमाप तसेच नगदी चुकारा मिळण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपला धान बाजार समितीच्या आवारातच विक्रीस आणावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

बाजार समितीच्या सूचनेनुसार, धानाची बोली सोमवार, बुधवार व शनिवार या दिवशी सकाळी ११ वाजल्यापासून घेण्यात येईल. तर कडधान्याची बोली रविवार व गुरुवार या दिवशी सकाळी ११ वाजल्यापासून होणार आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी बाजार समितीचे सभापती सचिन किरपान,उपसभापती लक्ष्मी कुमरे, सचिव हनुमंता महाजन तसेच संचालक मंडळ प्रयत्नशील असून, सर्व शेतकरी व व्यापारी बांधवांनी सहकार्य करावे, असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समिती, रामटेकच्या वतीने करण्यात आले आहे.

## ताडपत्री बंधारे पॅटर्नचे ४०० नाल्यावर बंधारे

### आर्ट ऑफ लिव्हिंग व महाराष्ट्र शासनाचा उपक्रम, पाण्याची पातळी वाढण्यास होणार मदत,राज्यमंत्री आशिष जैस्वाल यांचा पुढाकार



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

'ताडपत्री बंधारा पॅटर्न' या नवीन संकल्पनेच्या पार्श्वभूमीवर रामटेकमधील ज्या नाल्यांमधून नदीचे पाणी वाहून जात आहे, अशा ४०० नाल्यांवर बंधारा बनवण्याचे काम राज्यमंत्री अँड. आशिष जयस्वाल यांनी घेतले आहे. मागील पाच दिवसात असे ५० बंधारे तयार करण्यात आले असून ही संख्या १००० पर्यंत नेण्याचा आपला प्रयत्न आहे. याअंतर्गत हिवरा-हिवरी येथे या माध्यमातून जलसंधारणाचेही काम केले जात आहे. नाल्यांमधून वाहून जाणारे पाणी अडवून शेतकऱ्यांना धान पिकासाठी ते उपलब्ध करून दिले जात आहे. यामार्फत गावाच्या पाण्याची पातळी वाढेल आणि जनावरांनादेखील पिण्यासाठी पाणी उपलब्ध होईल. श्री श्री रविशंकर जी यांच्या आर्ट ऑफ लिव्हिंग मार्फत त्यांची टीम विविध गावांमध्ये या बंधाऱ्यांसाठी कार्य करत आहे. आजवर लोकसहभागातून हे काम होत आले आहे. येत्या काळात शासन दरबारी देखील या कामासाठी आपण सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे असे राज्यमंत्री अँड. आशिष जयस्वाल यांनी सांगितले. यावेळी आर्ट ऑफ लिव्हिंग रणजित घिवतोडे, भूमेश्वर चाफले सह गावकरी प्रामुख्याने उपस्थित होते.

## शालेय विद्यार्थ्यांच्या बसचालकावर मद्यप्राशन करून बस चालवल्याचा आरोप

### सालेकसा बसस्थानकावर नागरिकांशी वाद!

**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**

जिल्हा गोंदिया बस आगारामार्फत शालेय विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी सकाळी ८ वाजताच्या सुमारास सालेकसा बसस्थानकावर बस थांबविण्यात येते. मात्र, दिनांक ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी संबंधित बसचालकाने मद्यप्राशन केलेल्या अवस्थेत बस



चालविल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात आला आहे. एवढेच नव्हे तर बसचालकाने बस रस्त्याच्या अगदी मधोमध उभी केल्याने इतर वाहनधारकांना, विशेषतः चारचाकी वाहनांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. या प्रकारामुळे त्रस्त झालेल्या स्थानिक नागरिकांनी बसचालकाला बस बाजूला घेण्यास सांगितले असता, चालकाने नागरिकांशीच वाद घातल्याचे सांगण्यात येत आहे. शालेय विद्यार्थ्यांच्या वाहतुकीसाठी असलेल्या बसचालकाकडून असा प्रकार घडणे ही अत्यंत गंभीर बाब असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.

**विद्यार्थ्यांची सुरक्षा महत्त्वाची की नागरिकांशी वाद?**

शालेय विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी बससेवा उपलब्ध करून दिली जात असेल, तर बसचालकाने बस योग्य ठिकाणी आणि रस्त्याच्या बाजूला उभी करून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देणे अपेक्षित आहे. मात्र, रस्त्याच्या मधोमध बस उभी करणे आणि नागरिकांशी वाद घालणे कितपत योग्य आहे, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. या घटनेची गोंदिया बस आगार प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन संबंधित बसचालकाची चौकशी करावी. मद्यप्राशन केल्याच्या आरोपाची योग्य तपासणी करून दोषी आढळल्यास कठोर कारवाई करावी, तसेच शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा विचार करून जबाबदार व शिस्तप्रिय बसचालकाची नियुक्ती करावी, अशी मागणी सालेकसा येथील नागरिकांनी केली आहे. विद्यार्थ्यांच्या जीविताशी संबंधित असलेल्या या विषयाकडे एसटी महामंडळ प्रशासनाने दुर्लक्ष करू नये, अशी अपेक्षाही नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# दुष्काळी परिस्थितीत शरद पवार मैदानात

### विकायला गाव काढलेल्या तुळशीत दुष्काळाची पाहणी करणार, थेट ग्रामस्थांशी साधणार संवाद

**वृत्तसंस्था, मुंबई**

राज्यात सध्या दुष्काळी परिस्थिती आहे. पिण्याच्या पाण्याचा जनावरांच्या चाऱ्याचा मठा प्रश्न निर्माण झाला आहे. बहुतांश ठिकणी शेतकऱ्यांची पिकं देखील करपून गेल्याची स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळं सरकारनं राज्यातील दुष्काळ जाहीर केला आहे. दरम्यान, या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख आणि माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार हे मैदानात उतरले आहेत. उद्या ते सोलापूर जिल्ह्यातील तुळशी गावाला भेट देणार आहेत. तिथे दुष्काळी परिस्थितीची पाहणी करणार आहेत.

**तुळशी गावातील दुष्काळी परिस्थितीचा शरद पवार हे आढावा घेणार**

दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या



शेतकऱ्यांची परिस्थिती जाणून घेण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख आणि माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार उद्यापासून दुष्काळ पाहणी दौरा करणार आहेत. या दौऱ्यादरम्यान उद्या ते सोलापूर जिल्ह्यातील तुळशी गावाला भेट देणार आहेत. दुपारी साडेतीन वाजता शरद पवार तुळशी गावात पोहोचतील. यावेळी ग्रामस्थांशी संवाद साधत ते गावातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेणार आहेत. दरम्यान, तुळशी गाव विकणे आहे, असे पोस्टर लावल्यामुळे हे गाव राज्यभर चर्चेत आले होते. गावातील भीषण दुष्काळी परिस्थिती आणि पाण्याच्या टंचाईकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी ग्रामस्थांनी हे पोस्टर लावले होते. पाणीटंचाई आणि दुष्काळामुळे निर्माण झालेल्या संकटाची तीव्रता या माध्यमातून मांडण्यात आली होती. आता खुद्द शरद पवार तुळशी गावाला भेट देऊन ग्रामस्थांशी संवाद साधणार असल्याने या दौऱ्याकडे लक्ष लागले आहे.

# होर्मुझ सात दिवसात होणार खुले! इराण समृद्ध युरेनियम परदेशात हलविणार

**वृत्तसंस्था, तेहरान**

अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्ध थांबवण्या बाबतच्या वाटाघाटींची प्राथमिक फ्रेमवर्क तयार झाली आहे. त्यानुसार इराणने त्यांचे समृद्ध युरेनियम तिसऱ्या देशात ठेवण्याचा प्रस्ताव असून होर्मुझ देखील सात दिवसात खुलं करण्याबाबत प्राथमिक सहमती झाली आहे. याबाबतचे वृत्त अल अरेबियाच्या इंग्रजी वृत्तात देण्यात आली आहे.

या प्राथमिक ड्राफ्ट फ्रेमवर्क या न्यूज प्लॅटफॉर्मकडेच आहे. त्यात दावा केल्यानुसार या कराराची शाश्वतता आणि त्याची अंमलबजावणी होण्यासाठी चीन संभाव्य गॅरेंटर आहे. या प्रस्तावानुसार अमेरिका आणि तेहरान यांच्यात इस्तांबुल ऐवजी दोहा येथे थेट वाटाघाटी करण्यात येणार आहेत. प्रस्तावित करारानुसार इराण आपल्या न्युक्लिअर प्रोग्राम आणि समुद्री दळणवळणाच्या सुरक्षेबाबतची जबाबदारी घेणार आहे. त्याच्या बदल्यात अमेरिकेने इराणवर लावलेले निर्बंध हटवावेत तसेच जो ब्लॉकेड लावला आहे आणि आर्थिक बंधने घातली आहेत ती देखील कमी करावीत अशा तरतूदी आहेत. या फ्रेमवर्कमध्ये या अटी शर्तींचे पालन होत आहे का नाही याची स्वतंत्ररित्या खात्री करून घेण्याची व्यवस्था देखील निर्माण करण्यात यावी. ही पडताळणी व्यवस्था कराराच्या अंमलबजावणीच्या प्रत्येक टप्प्यावर मूल्यपामन करेल. यात एकमेकांना कळवल्याशिवाय कोणताही बदल करता येणार नाही. या स्वतंत्र वाद निवारण व्यवस्थेत मध्यस्थ आणि गॅरेंटर देशांचा देखील समावेश असेल. हे देश देखील होणारा विलंब आणि कराराचे उल्लंघन होत असेल तर त्यावर कार्यवाही करून नवा वाद किंवा लष्करी संघर्ष टाळण्याचा प्रयत्न करेल.

**होर्मुझमध्ये जहाजावर चुंबक बॉम्बने हल्ला**

इराण आणि अमेरिकेमध्ये सुरू असलेल्या संघर्षात वादाचं केंद्र ठरलेल्या होर्मुझच्या सामुद्रधुनीत आता माहवाहू जहाजांवर होत असलेल्या हल्ल्यांचा धोका अधिकच वाढला आहे. यादरम्यान शुक्रवारी ३० ऑक्टोबर रोजी भारतीय नाविक असलेल्या पनामाचा झेंडा लावलेल्या तेलवाहू जहाजावर चुंबक बॉम्बद्वारे हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात झालेल्या स्फोटामुळे जहाजाच्या इंजिन रुममध्ये आग लागली. त्यामुळे हे तेलवाहू जहाज काही काळ बंद पडले. सुदैवाने या हल्ल्यानंतर जहाजावर असलेले २७ भारतीय कर्मचारी सुरक्षित असल्याची माहिती समोर आली आहे.

# १८ शहरांत सीसीटीव्हीचे जाळे उभारणार

## सावनेरचा पुन्हा समावेश का...?

**१३६ कोटींच्या प्रकल्पाला गृह विभागाची मंजुरी; अर्धीच आधुनिक यंत्रणा कार्यान्वित असताना नव्या मंजुरीबाबत प्रश्नचिन्ह**

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी १८ शहरांमध्ये आधुनिक सीसीटीव्ही सर्व्हेलन्स यंत्रणा उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी १३६ कोटी २९ लाख ९२ हजार ४३३ रुपयांच्या खर्चाला गृह विभागाने ३० ऑक्टोबर रोजी प्रशासकीय मान्यता दिली असल्याचे व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकारातून हा प्रकल्प राबविण्यात येत असल्याची माहिती पुढे येत आहे सुरुवातीला या प्रकल्पात १५ शहरांचा समावेश होता. मात्र, उच्चस्तरीय समितीच्या निर्णयानुसार काटोल, सावनेर आणि वडोदा या तीन शहरांचा नव्याने समावेश करण्यात आला. त्यामुळे आता एकूण १८ शहरांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा उभारली जाणार आहे.

**या १८ शहरांचा समावेश**

उमरेड, बुटीबोरी, कन्हान-




पिपरी, रामटेक, नरखेड, कळमेश्वर, खापा, मौदा, मोहपा, भिवापूर, पारशिवनी, कुही, कांद्री, कोंढाळी, मोहपा, काटोल, वडोदा आणि सावनेर. शहरातील २५ प्रमुख ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून, गुन्हेगारी आणि वाहतूक नियंत्रणासाठी स्वयंचलित नंबर प्लेट ओळखणारे तसेच फिरते व झूम करता येणारे कॅमेरे बसविण्यात आले आहेत. या यंत्रणेद्वारे पोलीस स्टेशनमधून संपूर्ण परिसरावर लक्ष ठेवण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे.

**सावनेरमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित**

या निर्णयामुळे सावनेर शहरातील सीसीटीव्ही व्यवस्थेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. कारण, मागील वर्षीच सावनेर पोलीस स्टेशनमध्ये २४ तास कार्यरत मॉनिटरिंग व नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आला होता. सावनेर हा नागपूर जिल्ह्यातील पहिला डिजिटल तालुका म्हणून विकसित करण्यात आला होता. सावनेरमध्ये २४७७ नियंत्रण कक्ष, २५ प्रमुख ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे, ANPR नंबर प्लेट ओळखणारे कॅमेरे आणि ढळे फिरते व झूम करता येणारे कॅमेरे अशी यंत्रणा उपलब्ध असल्याचे नमूद करण्यात आले आहे.अशा परिस्थितीत सावनेरमध्ये एक वर्षापूर्वीच आधुनिक सर्व्हेलन्स यंत्रणा कार्यान्वित असताना नव्या १३६ कोटींच्या प्रकल्पात पुन्हा सावनेरचा समावेश का करण्यात आला, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

**आधीपासून असलेल्या यंत्रणेचे काय होणार...?**

नव्या प्रकल्पात आणखी कोणती सुविधा उपलब्ध होणार? यासाठी स्वतंत्र निधीची आवश्यकता का भासली? या प्रश्नांची उत्तरे प्रशासनाने स्पष्ट करणे गरजेचे आहे. आधीच्या यंत्रणेचे तांत्रिक मूल्यमापन करून नव्या प्रकल्पात तिचा समावेश केला जाणार आहे की स्वतंत्र यंत्रणा उभारली जाणार, हेही स्पष्ट होणे आवश्यक आहे.

या प्रकल्पासाठी नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक नियंत्रक अधिकारी असणार आहेत. आधुनिक तंत्रज्ञानामुळे जिल्ह्यातील सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम होण्याची अपेक्षा असली, तरी आधीच सुविधा उपलब्ध असलेल्या शहरांच्या समावेशाबाबत पारदर्शक माहिती देण्याची गरज आहे.

## पुनर्नियुक्त माजी सैनिक कर्मचाऱ्यांवरील अन्यायाविरोधात संघटना आक्रमक!

### प्रशासनाच्या मनमानी कारभाराचा निषेध, एकतर्फी निर्णय तातडीने रद्द करण्याची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

राज्यातील पुनर्नियुक्त माजी सैनिक कर्मचाऱ्यांवर प्रशासनाकडून वारंवार अन्याय होत असल्याचा आरोप करीत शासकीय पुनर्नियुक्त माजी सैनिक संघटना, महाराष्ट्र राज्य यांनी प्रशासनाच्या मनमानी कारभाराविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. यासंदर्भात संघटनेचे राज्याध्यक्ष संतोष मलेवार यांनी २९ ऑक्टोबर रोजी संपादकांना निवेदन पाठवून हा प्रश्न शासनदरबारी मांडण्याची मागणी केली आहे. संघटनेच्या निवेदनानुसार, ५ ऑगस्ट २०२६ रोजी मंत्री, सैनिक कल्याण विभाग, मुंबई यांच्याकडून अचानक बैठक आयोजित करण्याबाबत पत्र काढण्यात आले. मात्र, ज्या संघटनेच्या मागण्यांवर चर्चा होणार होती, त्या संघटनेलाच बैठकीची पूर्वसूचना अथवा निमंत्रण देण्यात आले नाही. तसेच विधान परिषद सदस्य आमदार परिणय फुके यांनाही पूर्वकल्पना देण्यात आली नसल्याने संबंधित बैठक ६ ऑगस्ट रोजी एकतर्फी पद्धतीने आयोजित करण्यात आल्याचा आरोप संघटनेने केला आहे. संघटनेच्या मूळ निवेदनावर राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते. मात्र, १० मार्च २०२६ पासून संबंधित अधिकाऱ्यांनी या निर्देशांवर कोणतीही ठोस कार्यवाही न करता प्रकरण प्रलंबित ठेवल्याचा दावा संघटनेने केला आहे.

**संघटनेच्या प्रमुख मागण्या**

एकतर्फी व मनमानी पद्धतीने घेण्यात आलेले संबंधित निर्णय तातडीने रद्द करावेत. संघटनेच्या प्रतिनिधींसोबत शासनाने तातडीने संयुक्त बैठक आयोजित करावी. प्रलंबित मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक पुनर्विचार करावा. उपमुख्यमंत्र्यांच्या सकारात्मक निर्देशांनुसार संबंधित अधिकाऱ्यांनी ठोस कार्यवाही करावी. पुनर्नियुक्त माजी सैनिकांनी देशसेवेनंतर शासकीय सेवेत योगदान दिले असतानाही त्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याची खंत संघटनेने व्यक्त केली आहे. शासनाने या निवेदनाची गांभीर्याने दखल घेऊन प्रश्न मार्गी न लावल्यास माजी सैनिकांना लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडावे लागेल, असा इशाराही संघटनेने दिला आहे. माजी सैनिकांचा न्याय मागण्यांना शासनाने सकारात्मक प्रतिसाद द्यावा आणि त्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी संघटनेने केली आहे.

# निधी बँकांकडून आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांचे आर्थिक शोषण आणि अवाजवी व्याजवसुली प्रकरणी मुख्यमंत्री, पालकमंत्री व जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

## निष्पक्ष चौकशी करून कठोर कारवाईची मागणी : वरुण पांडे

**दै. सिंहवाणी वृत्त, वर्धा**

निधी बँकांद्वारे गरीब, कष्टकरी व रोजंदारीवर काम करणाऱ्या नागरिकांकडून कथितरीत्या अवाजवी व्याजाची वसुली, आर्थिक शोषण तसेच कर्जवसुलीच्या वेळी दबाव व धमकी दिली जात असल्याच्या तक्रारींच्या अनुषंगाने भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती मोचार्चे प्रदेश सचिव तथा सामाजिक कार्यकर्ते वरुणभाई पांडे यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री पंकज भोयर तसेच जिल्हाधिकारी यांना लेखी निवेदन सादर करून या प्रकरणात तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे.

निवेदनामध्ये निधी बँकांची कर्जवाटप प्रक्रिया, व्याजदर, कर्जदारांकडून केली जाणारी वसुली, अतिरिक्त शुल्क तसेच कर्जवसुलीच्या पद्धतींची सक्षम यंत्रणेमार्फत निष्पक्ष व सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच मागील दोन ते तीन वर्षांत बँकांचा झालेला व्यावसायिक विस्तार, बांधण्यात आलेल्या इमारती, सुरू करण्यात आलेले इतर व्यवसाय तसेच मालमत्तांमध्ये करण्यात आलेल्या गुंतवणुकीच्या



स्रोतांचीही नियमानुसार चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

वरुणभाई पांडे म्हणाले की, गरीब व कष्टकरी नागरिक आपल्या कौटुंबिक आणि दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी कर्ज घेतात. अशा नागरिकांकडून अवाजवी व्याजाची वसुली केली जात असेल किंवा कर्जवसुलीच्या नावाखाली त्यांचा मानसिक छळ केला जात असेल, तर ही अत्यंत गंभीर चिंतेची बाब आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांच्या हितांचे संरक्षण करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे.

संबंधित सहकार विभाग, बँकिंग नियामक प्राधिकरण, पोलीस विभाग तसेच आर्थिक गुन्हे अन्वेषण यंत्रणेमार्फत या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. चौकशीदरम्यान कोणत्याही प्रकारची आर्थिक अनियमितता अथवा कायद्याचे उल्लंघन झाल्याचे सिद्ध झाल्यास संबंधित संस्था व जबाबदार व्यक्तींविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, असेही त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

वरणभाई पांडे यांनी मुख्यमंत्री, पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांना विशेष विनंती केली आहे की, या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने चौकशीचे आदेश द्यावेत, तसेच पीडित गरीब व कष्टकरी नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी ठोस पावले उचलावीत आणि अशा बँकांविरुद्ध कठोर कारवाई करावी.